# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख ५ माहे आक्टोंबर सन १९०८ इसवी [ अंक ३८



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकां........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेयाची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन आळी धल्या जातील.

नोटीस सुवाच्य असलें पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जतील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बॅंकेत खालीं दिलेल्या रटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. अणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल्दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बॅंकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } G. A Phillips एजंट
नं ७३



## बंगला विकाऊ

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर डिस्ट्रूक्ट जज्ज चांदा, मध्यप्रांत यांचा आकोला येथील बंगला विकावयाचा आहे. जनरल पोस्ट आफिसा समोरील विस्तीर्ण मैदानावर उभा आहे. ग्राहकांनीं विशेष विचारपूस खालीं सही करणाऱ्याकडे करावी. ता० १८-९-०८ इ०

नारायण खंडेराव फडके
नं. घ. ३९ वऱ्हाडसमाचार आकोला.


### नोटीस

नोटीस बेशमी— रा. रा. दाजी जानकीराम भुसारी राहणार खामगांव तालुके मजकूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मांस आमचे खामगांव वगैरे दुकानचें नांवचें मुक्त्यारपत्र शिवरतन शिवप्रताप अज्ञान पालन करणार आई राधाबाई जवजे शिवप्रतार या नांवानीं तारीख ११।११ १९०९ इ० रोजीं लिहून देऊन तारीख १२-११-०९ रोजीं रजिष्टर करून दिलें परंतु मी सज्ञान झालो वरून तुमचें मुखत्यारपत्र ता. १७-९-०८ रोजीं रद्द केलें आहे. करितां तुमचे जवळ आमचे दुकानचे संबंधी असलेले कागदपत्र आह्मांस देणें सबब नोटीशीनें कळविलें आहे. कळावें. ता० १७-११-०८ इ०

सही
सेवाराम शिवरतन
दस्तुर राम नारायण सांडके
नं. घ. ५२

### ईश्वरी क्षोभ

निजाम सरकारच्या राज्यावर आपोदेवतेचा इतका क्षोभ झाला आहे कीं एवढी १०००० लोकांची प्राणहानि आणि कोट्यावधी रुपयांच्या स्थावरजंगमात्मक मालमत्तेचा नाश हीं इंडियाच्या अठवणींत कचित्च घडलीं असतील. आणि या संकटामध्यें शहरभर पसरलेल्या प्रेतांच्या ढीगामधून दुर्धर व्याधी उत्पन्न होण्याविषयींची फार मोठी भीति पडली आहे, निजाम सरकारच्या राज्यांतील हजारों लोक दीनदीन वस्त्रहीन व अन्नहीन फिरत आहेत. तें अफाट हैदराबाद नगर उध्वस्त झालें असून सुमारें शंभर मैलापर्यंत आसमंतांतील भागांतही हृदयद्रावक दुःखें पसरलेलीं आहेत. हीं दुःखें कागदावर वाचण्यापेक्षां कल्पनेनें अधिक ग्राह्य होतील! आली वऱ्हाडची मंडळी निजाम सरकारचे प्रजाजन आहों आणि या दृष्टीनें निजाम सरकारचे या प्रसंगी शांतवन कसें करावें या विचारामध्यें सर्वजण उदासीन व व्यग्र आहेत. अशा प्रसंगीं एक रिलीफ फंड वऱ्हाडामध्यें लवकर निघाला पाहिजे आणि तो स्थापण्यासंबंधानें व तद्वारा वर्गणी गोळा करण्यासंबंधानें स्थानिक सरकार व लोकसमुह दोन्हीही तत्परतेनें या प्रसंगीं पुढें येतील असा आह्मांस या प्रसंगीं भरंवसा आहे. ईश्वराजवळ हीच प्रार्थना आहे कीं अशा दुर्घट प्रसंगीं तोच जगन्नियंता निजाम सरकारास धैर्य देवो. आणि पुढील मार्ग दाखवो!

## वर्तमानसार

कांहीं तरुण मंडळींनीं अलिकडे जे दरोडे घातले. त्यासंबंधानें पूर्व व पश्चिम बंगाल्यांत घरांच्या झडत्या घेण्याचा धूमधडका चालूं आहे. ता. २९ रोजीं राजशाहीचे वकील वसंतकुमार चौधरी याच्या घराची झडती घेण्यांत आली. झडतींत कांहीं मुद्देमाल सांपडला किंवा नाही तें अद्याप बाहेर आलें नाहीं.

व्यापार व उद्योगधंद्याच्या खात्यानें पुढील आशयाची प्रेसनोट प्रसिद्ध केली आहेः— इंडियन टेलिग्राफ डिपार्टमेंटमधील तारमास्तरांचा पगार वाढविण्यासंबंधानें हिंदुस्थान सरकारानें जो खलिता पाठविला होता, त्याला स्टेट सेक्रेटरींनीं तारेनें सर्व साधारण मंजुरी दिली आहे. ऑक्टोबरच्या मध्यास स्टेट सेक्रेटरींची खलिता येऊन पोहोंचला ह्मणजे पगाराचें प्रमाण वगैरेसंबंधानें तपशील प्रसिद्ध होईल. पगाराच्या वाढीसंबंधाच्या योजनेचें स्वरूप पुढें दिल्याप्रमाणें आहेः— जनरल सर्व्हिसमधील शेवटचा पगार ५० रुपये असावा व तो वार्षिक बढतीनें २०० पर्यंत वाढावा. जास्तींत जास्त पगार नौकरींत शिरल्यापासून २० वर्षांत मिळावा. लोकल सर्व्हिसमधील शेवटची जागा ३५ ची असावी व तिचा पगार वाढतां वाढतां २२ वर्षांत १३० पर्यंत वाढावा. १४ वर्षें नौकरी झाल्यावर टेलिग्राफ मास्तरची नोकरी मिळण्यास सिग्नलरांना एक परीक्षा द्यावी लागेल व त्या जागेला ते लायक आहेत असा वरिष्ठांचा अभिप्रायही असावा लागेल. १४ व्या वर्षी वरील शर्ती ज्यांच्या हातून पुऱ्या न होतील त्यांना पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील नौकरांस अनुक्रमें १४० व ९० रुपयांहून जास्त पगार मिळणार नाहीं. टेलिग्राफ मास्तरांचा पगार जनरल व लोकल सर्व्हिसमध्यें अनुक्रमें २०० व १३० पासून २५० व १८० पर्यंत वाढत जाईल. डेप्युटी सुपरिंटेंडेंटसचे दोन वर्ग करून त्यांपैकीं पहिल्या वर्गांतील लोकांस ३५० पासून ४०० पर्यंत व दुसऱ्या वर्गांतील लोकांस २५० पासून ३२५ पर्यंत पगार मिळेल. पगारास पूर्वीपेक्षां ५॥ लाख रुपये अधिक खर्च लागेल.

भांडवलवाल्याच्या आप्पलपोटेपणामुळें पाश्चात्य देशांत श्रीमंती आणि गरिबी ह्या दोहोंचीही परमावधि झाली आहे. विलायतेंत उत्पन्न झालेला बिनरोजगारी लोकासंबंधाचा प्रश्नही पर्यायानें ह्याच असमान संपत्तिविभागाचा परिणाम आहे. इंग्लंडांत बिनरोजगारी लोकांचे दंगेधोपे चालूं आहेत. गेल्या शुक्रवारीं मांचेस्टर येथें दंगा होऊन. बिनरोजगारी लोक टाऊन हॉलवर चढाई करून जाऊं लागले तेव्हां पोलिसांना आपल्या दंडुक्यांचा उपयोग करावा लागला. पोलिसांना व लोकांना जखमी झाल्या. ग्रीनविच येथील वर्कहाऊसवरही हल्ला करण्याचा लोकांनीं प्रयत्न केला, परंतु पोलिसांना त्यांना मागे परतविलें.

मराठी वर्तमान पत्राच्या खडल्याचा निकाल होऊन आरोपीस शेवटपर्यंत माफी मागण्याची सवलत दिली असतां त्यानें गुर्मीची वर्तणूक दाखविल्यामुळें कोर्ट त्यांस जबर शिक्षा देत आहे असें ठरावांत सांगून हायकोर्टानें रा. केळकर यांस १००० रुपये दंड, २०० खर्चाबद्दल आणि १४ दिवसाची साधी कैद अशी शिक्षा देऊन शिवाय दंडाची रक्कम व योग्य माफी लिहून देण्यांत येईपर्यंत आणखी कैद अशी शिक्षा दिली.

**धान्य व कडधान्यः**—एकंदर ३१ कोटीचा माल परदेशीं रवाना झाला. २० कोटींचे तांदुळ, ९ कोटीचे गहूं व कणिक व इतर प्रकार २ कोटीचे. मागील तीन वर्षाचे आंकडे पहातां गतवर्षी तांदुळाची निर्गत दोन कोटींनीं वाढली असें दिसून येईल. पृथ्वीवरील चारी खंडांतील प्रदेशांत हिंदुस्थानांतून तांदुळ रवाना होतात. पैकीं एक त्रीतीआंश किंमतीचा माल आशियांतील इतर प्रदेशांत व बाकी ३ इतर खंडांतील प्रदेशांत याप्रमाणें रवाना झाला. या वीस कोटींपैकीं ब्रह्मदेशांतून १४ कोटीचे, बंगालहून २ कोटीचे, मद्रासहून जवळजवळ ३ कोटीचे, सिंधमधून ६९ लक्षांचें व मुंबईहून फक्त ३३ लक्षांचें याप्रमाणें येथून तांदुळ निर्गत झाले.

चालू सालीं साऱ्या पंजाबप्रांतांत तापाची भयंकर सांथ उद्भवली असून लाहोर व अमृतसर येथील रहिवाशांना तिच्यापासून पुष्कळच पीडा होत आहे. माणसाच्या टंचाईमुळें देशी भाषेत निघणारें एक स्थानित वर्तमातपत्र बंद पडलें आहे. दुसरीं कांहीं पत्रें लहान आकाराचीं निघत आहेत नोकरांच्या टंचाईमुळें सरकारी अधिकाऱ्यांचीही त्रेधा उडाली आहे. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेला मालाचा उठाव कसा करावा, याची अडचण येऊन पडली आहे.

प्राथमिक शिक्षण मोफत करण्यासंबंधानें हिंदुस्थान सरकारकनें प्रांतिक सरकरांकडून मागविलेले अभिप्राय आतां हिंदुस्थान सरकाराकडे आले आहेत. प्रांतिक सरकारांचीं मतें शिक्षण मोफत देण्यास अनुकूल नाहींत. अधिक चांगल्या पायावर जास्त शाळा स्थापाव्यात व शिक्षण सर्व वर्गांच्या आटोक्यांत येईल असें करावें प्रांतिक सरकारांचें ह्मणणें आहे. प्राथमिक शिक्षण मोफत करण्यासंबधानें सध्यां विचार चालू असून त्यांतून कांहीं तरी निष्पन्न होईल यांत संशय नाहीं.

निजाम हैद्राबाद, रेसिडन्सी व त्यांच्या आसपासचा पंचक्रोशींतील प्रदेशांत नदीच्या पुरानें सर्वत्र हाहाकार उडवून दिला आहे. जिकडे जावं तिकडे पाणी किंवा चिखल! माणसें, मांजरें, कुत्री यांचीं सडलेलीं प्रेतें जागोजाग पडलीं आहेत! खुद्द बाजारांत तर प्रेतांचे ढीगच्या ढीग पडले आहेत! तेथून ९०० यार्डापर्यंतच्या अंतरावर नाक झांकलें ठेवून राहण्याची सोय नाहीं. इतकी दुर्गंधि सुटली आहे! नदींतून अद्याप प्रेतें वाहून चाललीं आहेत. मोठमोठाले वृक्ष पाण्यांतून तरंगत चाललेले दिसत आहेत! सर्व शहरांत जिकडे तिकडे रडण्याचा व ऊर बडविण्याचा भयप्रद ध्वनि कानावर येऊन काळीज अगदीं दुभंगून जाण्यासारखी आपत्ति दृष्टीस पडत आहे. बाजार बंद पडल्यामुळें जिवंत आहेत त्या लोकांना कित्येक दिवसपर्यंत उपास घडला. चिखलांत पडलेलें व सडलेलें धान्य वेंचून लोक तें पटापट खात आहेत! या आपत्तींत पटकीची भर पडून मृत्यूची छाया सर्व शहरावर पडते कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. चौलगुडा या नांवाचे ब्रिटिश हद्दींतील एक खेडें आहे तेथील एक हजार घरें व झोंपड्या चिखलांत रुतल्या आहेत! हजारों प्रेतें चिखलांत पुरुन गेलीं आहेत! एकट्या हैद्राबाद शहरांत आजपर्यंत अगदीं कमींत कमी दहा हजार लोक प्राणास मुकले असतील! पुरी चौकशी झाली ह्मणजे मृत्युसंख्या याहीपेक्षां अधिक झाली असली पाहिजे असें आढळून येईल. शहरांत जिकडे तिकडे शेंकडों घरें कोसळून पडून रस्त्यांत दगड, माती, विटा रोडे यांच्या टेकड्याच्या टेकड्या रस्त्यांत पडल्या आहेत. ता० २९ रोजीं शहरांतील कांहीं सखल भागांत साठ फुट पाणी झालें होतें! नबाब सर सालरजंग यांची अर्धी हवेली कोसळून पडली. नुकसान सुमारें तीन लाक्षांचें झालें असावें. गोरगरिबांच्या दुःखाचें तर वर्णनही देणें अशक्य आहे. इतका कष्टमय व खडतर प्रसंग हैद्राबादेसच काय, परंतु इतरत्र कोठेही क्वचितच आला असेल. श्रीमंत, नबाव, अमीर, उमराव यांना गांवांत जलमय होण्याची चिन्हे दिसतांच मोठ्या मिनतवारीनें का होईना! पण—आपला बचाव कसाबसा करतां आला. परंतु गरिबांनीं कोठें जावें? प्रेम असो, दुष्काळ असो, किंवा जलमय असो त्यांना बिचाऱ्यांना जागच्या जागींच मरण्याशिवाय गत्यंतर नाहीं. ज्ञा.

व्हाइसराय व ना. सर हार्वेअडॅमसन यांना धमकीचीं पत्रें पाठविल्याच्या आरोपावरुन कालीचरण मुकरजी यांस अलीगड येथें सेशन कमिट करण्यांत आलें होतें. हस्ताक्षर ओळखणाऱ्या एक्स्पर्टच्या पुराव्यावरुन आरोपीस असेसर्स यांनीं दोषी ठरविलें होतें. न्यायाधीशांचेंही मत तसेंच पडून त्यांनीं आरोपीस नऊ महिने सक्तमजुरी व ३०० रुपये दंड अशी ता० १ रोजीं शिक्षा दिली.

प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यास परवानगी मिळण्याबद्दल काळकर्ते रा. शि. म. परांजपे यांच्यातर्फे येथील हाय कोर्टांत फुलबेंचकडे अर्ज केला होता. पीलास परवानगी देण्याचें येथील हाय कोर्टानें नाकारिलें.

जर्मन बंदरांतून व जर्मन बोटावरुन आलेल्या पेट्यांपैकी दोन पेट्या बंदुका करणार हिंदी कारागीर घेईनात. पोलिसांनीं ह्या पेट्या फोडून पाहिल्या तो आंत शिशाचे मोठे पोकळ गोळे, बंदुका, संगिनी व गुप्त्या निघाल्या. पेट्यांवर व रजिस्टरांत ह्या पेट्यांत शिशाचा व पोलादी माल आहे एवढेंच लिहिलेलें होतें! या दोहोंखेरिज बाकीच्या ९१६ पेट्या कोठें गेल्या याचा शोध पोलिस करीत आहे.

मि. चिदंबर पिल्ले—यांचें अपील हायकोर्टामध्यें आज रोजीं निघणार आहे.

मोहपा (जि. नागपूर)—येथील सुशिक्षित पुढारी रा. हळदे व आणखी चार गृहस्थ यांजवर इं. पि. कोडच्या १४७ व २९६ कलमाखालीं आरोप ठेवून त्यांस सरकारनें सहा महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा दिली आहे. हे गृहस्थ स्वदेशी, बहिष्कार, मद्यपाननिषेध यांसंबंधाची चळवळ जोरानें चालवित असत आणि यांच्या चळवळीनें परकी साखर, कापड व मद्य यांस मोहपा गांवानें एका दिवसांत बहिष्कार घातला होता. या खटल्यांत २८ साक्षीदारांनीं आरोपीस अनुकूल अशी साक्ष दिली होती व या साक्षीदारांत एक गोहिल मुसलमान होता. या खटल्यांत सरकारतर्फे खटला करणारे, गुह्यासंबधानें चौकशी करणारे, साक्षीदार व खूद्द न्याय दणारे तहशीलदार हे मुसलमान होते. तहशीलदाराच्या निकालावर अपील करण्यांत आलें आहे.

ता. २४ सप्टेंबर रोजीं सांयकाळीं लाहोर येथें इरिगेशन खात्याचे हेडक्लार्क मि. राधाकृष्ण यांच्या दुसऱ्या मजल्यावरील रहावयाच्या खोलींत गल्लीच्या बाजूनें एक ज्वालाग्राही पदार्थ फेंकण्यांत आला. त्या वेळीं तेथें एक १३ वर्षांचा मुलगा दिव्यून पत्र वाचीत होता, तों ज्वालाग्राही पदार्थ खोलींतील टेबलावर येऊन आदळला व त्याचा भयंकर स्फोट झाला. या स्फोटामुळें त्या मुलाच्या कपाळावर, उजव्या गालावर जखमा झाल्या असून त्याचा उजवा हात खांद्यापासून बोटापर्यंत जायबंदी झाला आहे. तो आवाज ऐकून पुष्कळ लोक तेथें धांवून गेले, व त्या मुलास लागलींच औषधोपचारासाठीं आसि. सर्जन मिरझा याकुब बेग यांच्या स्वाधीन करण्यांत आलें. हा मुलगा दयानंद हायस्कूलांतील एक सालस स्वभावाचा विद्यार्थी आहे. ज्वालाग्राही पदार्थ फेकणाराचा अद्याप पत्ता लागलेला नाहीं पोलिसतपास जारीनें सुरु आहे.

रांची येथील ता. १९ चे भेटींत ले. ग. फ्रेझर यांनीं जैन लोकांस—'तुह्मी सदर पर्वताबद्दल अडीच लक्ष रुपये रोख व चार हजार रुपये दरसाल जें देऊं ह्मणतां ती रकम थोडी असून तुह्मी दरसाल पंधरा हजार रुपये द्यावेत. आतां जे पांच बंगले आहेत ते तर कायम राहतीलच पण वरील हुकूम अमलांत येईतोंवर आणखी जितके बंगले बांधण्यांस परवानगी देऊं, तितकेंही बंगले बांधले जातील वगैरे!' असें अपमानास्पद उत्तर दिल्यामुळें येथील जैनांत पुनःअसंतोष फैलावत आहे. मुंबईचे गव्हर्नर ह्मणतात बंगले बांधून सरकारांत राजनिष्ट जैनप्रजेचें मन दुखवावयाचें नाहीं, व सर फ्रेझर तर बंगले बांधले जातील असें सांगून जैनप्रजेला असंतुष्ट करतात. तेव्हां ही न्यायपद्धत कसली!

ता. २८ रोजीं हत्याराच्या कायद्याखालीं भवानीपूरचे सतीशचंद्र मुकरजी यांच्यावर अलिपूरचे ॲडिशनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. बर्ले यांच्यापुढें खटला चालला होता. मॅजिस्ट्रेट साहेबांनीं आरोपीस दोषमुक्त करून सोडून दिल्यावर त्याला लगेच कोर्टाबाहेर ताज्या आरोपावरून पोलिसनें पुनः पकडलें. लायसन्स नसतांना ९०० काडतुसें जवळ ठेवल्याचा त्याच्यावर आरोप आहे. एक हजार रुपयांचा जातमुचलका व प्रत्येकी दोनशें रुपयांचे दोन जामीन घेऊन त्याला जामिनावर सोडून देण्यांत आलें.

कलकत्ता येथें ता. २८ सप्टेंबर रोजीं सकाळीं एका भंग्याला एका सार्वजनिक शौचकूपांत सहा काडतुसें कापडाच्य तुकड्यांत गुंडाळलेलीं सांपडलीं. काडतुसें पोलिसच्या हवालीं करण्यांत आलीं. पोलिपोलिसची चौकशी चालू आहे. हत्याराच्या कायद्याखालीं आपणावर खटला होईल ह्या भीतीनें मालकानें हीं काडतुसें टाकून दिलीं असावींत, असा तर्क आहे.

कनय्यालाल व सत्येंद्रनाथ बोस हे दोघे माफीचा साक्षीदार गोस्वामी याचा पाठलाग करीत असतांना त्यांना पकडण्याचा मि. लिटन नांवाच्या एका रखवालदार कैद्यानें मोठ्या शौर्यानें प्रयत्न केला; परंतु गुन्हेगारांनीं त्याच्यावर छापा घालून त्यास जखमी केलें यामुळें त्याचा इलाज झाला. त्यानें जें शौर्य दाखविलें त्यामुळें व त्याची एकंदरीनें चांगली वर्तणूक असल्यामुळें त्याच्या एक वर्षाच्या कैदेच्या शिक्षेपैकीं राहिलेले सहा महिने शिक्षा माफ करण्यांत येऊन त्यास सोडून देण्यांत आलें आहे.

दरवडेखोरांच्या कित्येक टोळ्यांनीं हावरा हुडळी, नदीया व २४ परगणे, या जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं दरवडे घातले नदींतून जाणाऱ्या मोठमोठाल्या बोटींतील मालाचीही त्यांनीं कित्येक वेळां लूट केली. आजपर्यंत एकंदर दरवड्यांची संख्या ९० जवळ गेली असून लुटून नेलेल्या मालाची किंमत ९० हजार रुपये असावी असा अंदाज आहे. पोलिसला अद्याप सर्व लोकांचा तपास लागलेला नाहीं तरी दोन टोळ्यांतील प्रमुख २४ लोकांना त्यांनीं हल्लीं पकडलें असून त्याच्यावर निरनिराळ्या ठिकाणीं खटले चालू आहेत. कांहीं दिवसापूर्वीं चांदूरजवळ नाटोररोडवर कांहीं चोरांनीं मेलच्या ड्रायव्हरचा खून करून मेलच्या कित्येक पिशव्या लुटून नेल्या. त्यासंबंधांतही हल्लीं पांच माणसांस पकडण्यांत आलें असून त्यांपैकीं अब्बास साधन नांवाच्या एका आरोपीनें आपला गुन्हाही कबूल केला आहे.

# टिळक डिफेन्स फंड.

केसरीवरील सध्या खटल्याचें आजपर्यंतचें काम लोकमान्य टिळक यांनीं स्वतःचालविल्यामुळें लोकांकडून आश्रय मागण्याची जरूरी पडली नव्हती. आतां यापुढें प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करण्याचा शेवटचा उपाय करुन पाहावा, असें कायदे जाणणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या हितचिंतकांचें ह्मणणें पडल्यावरुन प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करण्याचें ठरविलें आहे. याकामीं सुमारें २०-२५ वीस पंचवीस हजार रुपये खर्च येइल असा अदमास आहे. एवढें ओझें केसरीवर टाकून भागणार नाहीं. ह्या फंडासंबंधानें खाजगी रीतीनें कांहीं रक्कम गोळा करण्यांत आली आहे.; पण कोणावरो विशेष ओझें पडूं नये, या हेतूनें हें विनंतीपत्र काढिलें आहे.

केसरीचील वर्गणीदारांनीं प्रत्येकीं १ रुपया जात देण्याचें मनांत आणलें तरी ही रक्कम सहज जमा हाण्यासारखी आहे. तरी केसरीचे वर्गणीदारांनीं व लो. टिळक यांजविषयीं ज्यांना सहानुभूती असेल त्यांनीं आपापल्या सोइप्रमाणें तातडतोब रकम पाठविण्याची मेरबानी करावी.

वर्गणी पाठाणें ती केसरी म्यानेजर पुणें किंवा राष्ट्रमत म्यानेजर मुंबई यांजकडे जमा करावी. जमलेल्या रकमेचा खर्च लो. टिळक यांचे स्नेही व सल्लागार मार्फत होईल; व पुरेशी रक्कम जमतांच वर्गणी घेण्याचें बंद केलें जाईल.

नरसिंह चिंतामण केळकर
कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर.

## शील.

(एका सन्मान्य मित्राकडून.)

शील ह्मणजे आचार असा सामान्य अर्थच आपण धरून चालूं. यांत बाणेदारपणा, सत्यप्रीति, धैर्य, स्वमतप्रतिपादनार्थ जरूर असलेलीं संकटें सोसण्याची तयारी वगैरे गुणांचा अंतर्भाव साहाजिकपण होतोच सामान्यतः मनुष्याच्य ज्ञानाचे दोन विभाग करितां येतात. एक पुस्तकी ज्ञान व दुसरें अनुभव जन्य ज्ञान. शाळाचे विद्वान असें ह्मणतात. पहिल्या प्रकारचें ज्ञान प्राप्त करून घेण्यास दुसऱ्याच्या मानानें तितके कष्ट पडत नाहींत. त्या मानानें दुसऱ्याचीच किंमत जास्त आहे हें उघड आहे. दुसऱ्या शिवाय पहिल्याची पूर्तता होणें शक्य नाहीं. किंबहुना जगांत अशीं उदाहरणें आढळतात कीं पहिल्याप्रकारच्या ज्ञानाच्या वरच्या पायरीवर बसलेलें इसम प्रसंग प्राप्त झाला असतांना दुसऱ्या प्रकारच्या ज्ञानाच्या शेवटच्या पायरीवर सुद्धां बसतात न बसतात. यास इतिहास पुराणांतरींही पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. आपल्यांत एक ह्मण आहे कीं 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत.' याचा अर्थ सर्वांस माहीतच आहे. विद्वत्ताप्रचुर व्याख्यान देणाऱ्या पुराणिकांच्या अंगांत वरीं जाऊन वांग्यांची भाजी न खाण्याइतका मनोनिग्रह नाहीं. बायकांत अशीं उदाहरणें प्रत्यहीं

व्यवहारांत बारीक शिक्षण करणारास शेंकडों आढळून येतील.

जगांत आचाराचें महत्व कधींच कमी झालेलें नव्हतें. व तसेंच तें आतांही नाहीं. 'नर करणी करे तो नरका नारायण हो' या कबीरकृती ह्मणींत सुद्धां 'करणी' हा शद्ब महत्वाचा आहे. 'अहं ब्रह्म' हें वाक्य पुष्कळांस माहीत असेल. ह्मणून तें माहीत असलेला प्रत्येक मनुष्य ब्रह्माची योग्यता पावत नाहीं; त्या अर्थी पोपटपंची ज्ञानापलीकडे मनुष्यांचें कर्तव्य खास आहे. व तें आचार हें होय. शास्त्रांतहि 'आचारः प्रथमो धर्मः' असें ह्मटलें आहे. ही गोष्ट प्रत्येकांस व्यक्ति या नात्यानें सारखीच लागू आहे. तर मग कोणत्याही समुदायाचे अग्रणी (मग तो समुदाय लहान असो अगर मोठा असो) या नात्यानें त्या व्यक्तींवर विशेष जबाबदारी येते हें उघड आहे.

कोणताही समुदाय एखाद्या व्यक्तीला आपला नेता अथवा अग्रणी समजतो, अगर मानतो तो केवळ त्या व्यक्तीला अमुक विचारें माहीत आहेत एवढ्याकरितां खास नव्हे व ह्या गोष्टी वाचक वर्गापैकीं कित्येकांना माहीतही असतील. तरी हीं विचारें कसोटीस लागण्याची वेळ आली असतां तीं खरीं करून दाखविल अगर दाखविण्याचा शक्य तो प्रयत्न करील या भरंवशानेंच तो समुदाय त्यास अग्रणी समजतो. अशा दृष्टीनेंच पाहिलें असतां जो मनुष्य केलेलीं विधानें प्रयत्न न करितां नुसत्या दरडावणीनें अगर भावी संकटाच्या अगाऊ भीतीनें परत घेतो, अथवा त्याचेबद्दल दिलगिरी प्रदर्शित करितो अथवा सपशेल माफी मागतो तो समाजाची किती हानि करितो याचाच आज महत्व विचार कर्तव्य आहे. व्यक्तीदृष्ट्या तो कोणत्याही कोटींत जाऊन पडो कारण वाचक वर्गामध्यें शेंकडों अशा व्यक्ति सांपडतील कीं त्यांना स्वतः जबाबदारी घेण्याची इच्छा नसून त्यांच्या करितां ती दुसऱ्यांनीं घ्यावी अशी त्यांची इच्छा असते. किंबहुना याचकरितां ते त्यास अग्रणी मानतात.

या ठिकाणीं कित्येक अशी शंका घेतील कीं "कांहो मनुष्य चुकीस पात्र नाहीं काय!" यावर असें उत्तर आहे कीं "बाबांरे, अलबत आहे. व चुकीबद्दल जितक्या लवकर माफी मागतां येईल तितके मागणें हा एक थोर सद्गुणच आहे. परंतु दुसऱ्यानें पृच्छा केल्या बरोबर "नाहीं" नाहीं फिरून करणार नाहीं, क्षमस्व क्षमस्व असें ह्मणण्याची पाळी यावी इतकी ढोबळ चूक कित्येक दिवस ज्याच्या नजरेस येत नाहीं अथवा वाचक वर्गापैकींही ती कोणी कळवीतही नाहीं; परंतु एखादा क्षुल्लक आंकडा अगर शद्ब मागें पुढें झालेला असल्यास त्याची मात्र दुरुस्ती वेळेवर छापली जाते हें काय गौडबंगाल आहे असा सहज प्रश्न उत्पन्न होतो. इतकी ढोबळ चूक कित्येक दिवस ज्याच्या ध्यानीं मनीं सुद्धां येत नाहीं अशा कोणत्याही मनुष्याला सुशिक्षित व्यक्ती या नात्यानें सुद्धां स्वतःचें समर्थन करितां येईल किंवा नाहीं याची शंकाच आहे. समाजाग्रणी या नात्यानें नाहींच नाहीं. कांहीं याचें असें समर्थन करण्याचा प्रयत्न करतील कीं अहो बोलणें फार सोपें आहे. पण वेळ आली ह्मणजे कठीण आहे. सगळेचकां सारखे असतात? यावर माझें ह्मणणें असें आहे कीं तुमचें ह्मणणें सर्वस्वी खरें आहे; परंतु कोणी कोणावर तूं अमुकच लिही किंवा इतक्याच ओळी लिही असा भार घातलेला नाहीं. व घालून कोणी ऐकणारही नाहीं. जें आपल्या मनाला खरें वाटतें तेंच लिहावें, प्रसंग आल्यास तें तसें असल्याविषयीं कायदेशीर पराकाष्ठेचा प्रयत्न करावा व नंतर कदाचित् आपलें खोटें अगर गैरशिस्त ठरलेंच तर क्षमाही मागावी. मनोदेवतेला खरी वाटत असलेली गोष्ट कायदा बहुतकरून खोटी अगर वाईट ठरवीत नाहीं. इतका इंग्रज सरकारचाकायदा लवचीक नाहीं. परंतु परिस्थितीमुळें ह्मणा अगर कोणतेही कारणामुळें ह्मणा मनोदेवतेच्या विरुद्ध कांहीं कायदा सांगू लागला तर मनोदेवतेला मानदेणें जरूर आहे कारण तेणेंकरून न्यायाला मान दिल्यासारखा होतो. अर्थात् हा व्यक्तीदृष्ट्या विचार नव्हे तर समाजानें या दृष्टीनें विचार केलेला आहे.

सारांश आपले लोक बुद्धिमत्तेनें, कर्तबगारीनें, व सर्व बाजूंनीं इतर राष्ट्रांतील लोकांची बरोबरी करणारे आहेत असें जेव्हां आपण मोठ्या डौलानें सांगत सुटतो त्या वेळेस परकीय लोक एक मोठे मार्मिक लहानसें झुबीदार पण सत्य असें उत्तर देतात. तें हें कीं बाबांनो तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें आहे पण तुमच्यांत ह्या रि- निर्दिष्ट केलेला गुण नाहीं" ही गोष्ट किती खरी आहे याचे पदोपदीं दाखले येत आहेत. स्वदेशबांधवहो हा तुह्मांस सद्गुण वाटत नाहीं काय? वाटतच नसल्यास या देशाचें दुर्भाग्य कधीं संपेल कीं नाहीं याची जबर शंका येते. तो तुह्मांस जर सद्गुण वाटत असल्यास तुह्मी तो आपल्या अंगांत आणण्याचा कधीं प्रयत्न कराल! मला वाटतें आतां मुहूर्त पहाण्यांत वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. तर ह्या मुख्य गोष्टीचें साधन करण्यांस तावडतोब प्रारंभ करा.

---

# वऱ्हाडसमाचार

आश्विन शुद्ध १० शके १८०३

## हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण

हिंदुस्थानच्या शिरांवरील लष्करी खर्चाचा बोजा दरसाल ४९ लक्ष रुपयांनीं वाढविण्यांत आला आहे. इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यामध्यें लष्करी खर्चाची वाटणी कशी करावयाची, या प्रश्नाचा विचार करण्याकारितां गेल्या वर्षाचे अखेरीस एक कमिशन नेमण्यांत आलें होतें. हिंदुस्थानवर लष्करी खर्च अगोदरच वाजवीपेक्षां जास्त लादलेला ह्मणून तो कमी व्हावा अशी शिफारस हें कमिशन करील अशी लॉर्ड मोर्ले यांची अटकळ होती. या बाबतींत हिंदुस्थानाला कोणीच विचारीत नाहीं हें प्रसिद्धच आहे. इंग्लंडमधील मतदारांच्या इच्छेपुढें अधिकारारूढ झालेल्या प्रधान मंडळाला इंग्लिश प्रजेवर जास्त कर लादणें अयात् सोपें नाहीं. पण हिंदुस्थानांत तेथील प्रजेच्या इच्छेप्रमाणें कोणी अधिकारारूढ होत नाहीं. येथील कोणत्याहि आवकाऱ्याच्या कोणत्याहि कृतीवर प्रजामताचा दाब बसूं शकत नाहीं, त्यामुळें इंग्लिश प्रजेवर लादावयाचा तो कर हिंदुस्थानच्या लोकांवर लादला, तरी विचारणार कोण! त्यांतहि विशेष वाईट हें आहे कीं अशा प्रकारचा बळी तो कानपिळी होण्याचा प्रकार वारंवार घडून येत असलेला लॉर्ड मोर्ले यांस माहित आहे. जेव्हां लॉर्ड मोर्ले यांचा पक्ष अधिकारारुढ नव्हता, तेव्हां त्यांनीं स्वतः अशा अन्यायाचा स्पष्ट शद्बांनीं निषेध केलेला असूनहि आतां स्वतःच्या हातीं अधिकार आल्यावर त्याच प्रकारचा अन्याय त्यांनीं खुशाल चालू दिला आहे. सर चर्लस डिल्क यांनीं लष्करी खर्चाचा बोजा हिंदुस्थानावर वाढविण्याच्या बाबतींत पार्लमेंटांत प्रश्न विचारले असतां लॉर्ड मोर्ले यांनीं अनेक वेळां असें उत्तर दिलें आहे कीं लष्करी खात्याच्या प्रधानांच्या मनांत तसें करण्याचें असलें तरी तें त्यांना सुलभ होणार नाहीं. त्यांच्या वाटेंत मी कृष्ण सर्पासारखा बसेन. या वरून हें स्पष्ट दिसून येतें कीं हिंदुस्थानच्या तिजोरीवर इंग्लंडच्या लष्करी खात्याची सारखी बुभुक्षितपणाची नजर असून त्या तिजोरीचा केव्हां लचका तोडावयास मिळतो याची तें खातें नेहमीं वाट पहात असतें. त्याच प्रमाणें जेव्हां जेव्हां ह्मणून संधी येते तेव्हां तेव्हां लष्कराचा खर्च हिंदुस्थानावर लादण्याची या खात्याची नेहमीं तयारी असते, हें सर्व लॉर्ड मोर्ले यांस पक्कें ठाऊक आहे. पण लष्करी खात्याच्या मार्गांत सज्य होऊन बसणारा कृष्णसर्प दरसाल ४९ लक्ष रुपयांची चाट हिंदुस्थानच्या तिजोरीला बसल्याचे वेळीं निद्रिस्त होता कीं काय नकळे. स. १९०६ मध्यें लॉर्ड मोर्ले यांनीं हिंदुस्थानच्या जमा खर्चाचा खर्डा प्रथम पार्लमेंटपुढें सादर केला तेव्हां लष्करी खर्चाची ही हिंदुस्थानवरील काळरूपी छाया कशी भयंकर आहे याचें वर्णन त्यांनीं केलें होतें. तेव्हां तें ह्मणाले, 'गेल्या दहा पर्यंत सैन्याची संख्या वाढली आहे. स. १८९६-९७ व १९०६-०७ या मुदतींत अनुक्रमें २ लक्ष २७ हजार व २ लक्ष ३१ हजार मनुष्यांची वाढ झाली. पण ब्रिटिश लष्करांत मुळींच वाढ झालेली नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट आहे. स. १८९६-९७ मध्यें हिंदुस्थानांतील लष्कराचा खर्च २२ कोटि रुपये होता. यंदा तो २७ कोटि रुपये आहे. मागील प्रधान मंडळानें हिंदुस्थानांत असलेल्या ब्रिटिश सैन्यांतील नॉनकमिशन लोकांना नेहमीं पेक्षां जास्त पगार देण्याचें सुरू केलें. पण ज्या कारणाकरितां पगारांत ही वाढ करावी लागली त्याबद्दल हिंदुस्थान सरकार किंवा प्रधान मंडळ मुळींच जबाबदार नव्हतें. सामाजिक स्थितिमुळें ब्रिटिश लष्कराचा पगार वाढवावा लागला. त्याला कोणाचाच इलाज नसला, तथापि त्याचा परिणाम असा झाला कीं हिंदुस्थानावर दीड कोटीचें ओझें जास्त बसलें. पण हें स. १९०६ मधील लॉर्ड मोर्ले यांचे विचार आहेत, १९०८ मधील नव्हेत. हा बोजा असाच कायम राखावा इतकेंच नव्हे तर आणखी बोजा चढवावा असें त्यांचें आतांच मत आहे आणि असें करण्याला कारणें पूर्वीचीच आहेत. सामाजिक स्थितींत आणि शिक्षण वगैरेच्या बाबतींत पूर्वीच्या स्थितींत फरक पडल्यामुळें दरसाल ४९ लक्ष रुपयांनीं खर्च वाढविण्यांत आला आहे. ह्मणजे ब्रिटिश शिपायी तयार करण्याचा हिंदुस्थान हा एक फुकटचा आखाडाच होऊन बसला आहे. या आखाड्याला कांहीं द्यावें लागत नाहीं आणि देण्यास भाग पाडण्याची कोणाच्या अंगी शक्ति नाहीं. वसाहतींत जें सैन्य व आरमार आहे त्यांच्या खर्चापैकीं बराचसा भाग इंग्लंड सोसतें. पण ती गोष्ट निराळी. कारण इंग्लंडनें खर्चाची वाटणी द्या ह्मणून ह्मटलें तरी वसाहती खुशाल नाहीं ह्मणून सांगणार हें ठरलेलेंच आहे. आणि सक्तीनें वसूल करण्याचें इंग्लंडनें मनांत आणलें तर वसाहती साम्राज्याचा संबंध तोडून मोकळ्या होण्याला तयारच आहेत. हिंदुस्थानावर सालदरसालचा हा नवीन बोजा बसवितांना पार्लमेंटमध्यें या प्रश्नावर खल होऊं दिला नाहीं हें तर अत्यंत गर्हणीय आहे. सन १९०६ मध्यें लार्ड मोर्ले यांनीं या प्रश्नावर भाषण केलें तेव्हां त्यांवर पार्लमेंटमध्यें खल होण्यापूर्वी या प्रश्नाचा निकाल लावण्याचें त्यांच्या मनांत आहे असें मुळींच वाटलें नव्हतें. लार्ड किचनेर यांनीं तयार केलेल्या योजनेसंबंधानें बोलतांना लॉर्ड मोर्ले असें ह्मणाले होते कीं लॉर्ड किचेनर व हिंदुस्थान सरकार यांच्याशीं माझा पत्रव्यवहार चालू असून इंग्लंडच्या सरक्षण कमिटीशींही बोलणें चालू आहे. या सर्वांचा पुरता विचार केल्या खेरीज मी या प्रश्नाची विल्हेवाट करणार नाहीं.' पण शेवटीं त्यांच्या स्वतःच्या त्यावेळच्या कल्पनेच्या विरुद्ध असा मार्ग त्यांनीं धरला. आणि तसें झालें ह्मणून हिंदुस्थानच्या लोकांना यासंबंधांत समग्र खुलासा अवश्य मिळाला पाहिजे. झालेला निश्चय पक्का आहे असें समजतें. हें खरें असल्यास लार्ड मोर्ले यांच्या अमदानींतील ही दुसरी वज्रलेप गोष्ट होय. आणि याही बाबतींतील जबाबदारी त्यांच्याच शिरीं आहे या एकंदर प्रकारावरून असें दिसतें कीं इंग्लंडामधील फाजील साम्राज्यतृष्णेच्या लोकांचे लॉर्ड मोर्ले यांचेवर फारच वजन असून इंग्लिश प्रजेवर करांतून मुक्त ठेवण्याच्या खटपटींत हा परस्पर हालवायाच्या घरावर ब्रह्मार्पण करण्याचा प्रकार त्यांच्याच खटपटीमुळें घडून आलेला असावा. ब्रिटिश लोकांच्या सदाद्विवेक बुद्धीवर भरंवसा ठेवून त्यांच्या सत्वबुद्धिस भीड घालावयाचा मार्ग सर्वांना कबूल आहे. पण जेथें स्वार्थ आडवा आला तेथें सदसाद्विवेकबुद्धीला पुढें कोण येऊं देणार! साम्राज्याच्या संरक्षणासाठीं लष्कर ठेवावें लागणार आणि लष्करासाठीं

खर्च चालू ठेवावा लागणार. तो कांहीं टाळतां येत नाहीं. हें सर्व कबूल आहे. पण या खर्चाचा कितवा हिस्सा हिंदुस्थानानें द्यावा याला कांहीं ताळतंत्रच ठरलें नाहीं. ब्रिटिश सरकार वाढवील तितका तो वाढणार आणि लोकांना तो मुकाट्यानें दिल्या खेरीज गत्यंतर नाहीं.

## हायकोर्टाच्या इभ्रतीची जपणूक

टिळक प्रकरणांतील हायकोर्टाच्या बेअदबी संबंधाचे दोन्ही खटले निकालास लागले आहेत. हिंदुस्थानांत अशा प्रकारचे खटले बहुतेक अश्रुतपूर्व आहेत, त्यामुळें मुंबई हायकोर्टानें ह्या प्रसंगीं दिलेला निकाल बराच महत्वाचा आहे. हायकोर्टे ही देशांतील अत्युच्च न्याय पीठें आहेत तेव्हां त्यांतील न्यायाधीशांच्या अंगीं निर्मळ न्याय करण्याची पात्रता इतरांपेक्षां अधिक आहे किंवा ती आहे असें मानणें तरी अपरिहार्य आहे. अशा कडकडीत सोवळ्या न्यायाधिशांकडून न्यायबुद्धी खेरीज अन्य कोणत्याही मनोवृत्तीच्या अगर शक्तीच्या प्रभिावामुळें न्याया संबंधी कोणतीही कृती होणें शक्य नाहीं असें मानणें भाग आहे. जी सत्ता आजच्या घटकेस देशावर हुकमत चालवीत आहे तिच्याशी जोंपर्यंत समाजानें उघड द्वैत आरंभिलें नाहीं तोंपर्यंत त्याच सत्तेनें निर्माण केलेल्या न्याय पीठाविषयीं आपल्या मनांत आदर आहे, हें समाजानें निदान प्रकट व्यवहारांत तरी दाखविलें पाहिजे. मुंबई हाय कोर्टाचा न्यायीपणा आज सर्वांस मान्य करावा लागत आहे तो याच कारणामुळें. टिळक प्रकरणांत त्या हायकोर्टानें दिलेल्या निकालावर कडक टीका झाली हें सर्वांस कबूल आहे; किंबहुना तसें झालें नसतें तर रा. टिळक ह्यांच्या विषयींचे आपलें कर्तव्य समाजानें केलें नाहीं असें ह्मणावें लागलें असतें. हायकोर्टाच्या न्यायीपणाविषयीं जितका आदर समाजाला दाखवावा लागत आहे त्या पेक्षां किती तरी पटीनें जास्त आदर समाजाच्या अंतःकरणांत खरोखर वसत आहे. रा. टिळका संबंधाच्या समाजाच्या अतःकरणांतील ह्या भावाची मुंबई हायकोर्टाला कराव्या लागणाऱ्या जुलमाच्या रामरामाशी तुलना होणेंच शक्य नाहीं. रा. टिळकावरील समाजाची निष्ठा सर्व व्यावहारिक मानापमानाच्या नियमाच्या पलीकडची आहे आणि त्या निष्ठेखातर कोणताही अपमान किंवा पीडा सोसण्याला समाज तयार आहे हें प्रस्तुतच्या खटल्यावरून दिसून आलें आहे. अमुक एका पत्रकारानें अमुक एका कडक शब्दाचा उपयोग केला किंवा अमुक अशा प्रकाची शंका उत्पन्न होत असल्याचें त्यानें जाहीर केलें, यांत त्या पत्रकारानें तें सर्व कोणत्या हेतूनें केलें याचा विचार होणें अवश्य आहे. रा. टिळक सहा वर्षें पर्यंत समाजाला अंतरले ही गोष्ट राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या मनाला मोठा धक्का बसविण्यास कारण झाली आहे. रा. टिळक स्थापित सत्तेच्या कायद्याप्रमाणें शासनार्ह ठरले तरी ईश्वरी न्यायानें ते दोषी नाहींत असा समाजाला पक्का भरवंसा आहे. त्यांचें प्रत्येक कार्य निरपेक्ष बुद्धीनें केवळ समाजहिता करितां चाललें होतें याविषयीं समाजाला मुळींच शंका नाहीं. समाजाचें हित साधण्यांत जे नानाप्रकारचे उद्योग त्यांना करावे लागले त्यापैकीं एकदा उद्योग प्रस्थापित सत्तेच्या अधिकाऱ्यांस असह्य होतोसा वाटला तथापि तो तसा व्हावा या उद्देशानें त्यांनीं कधीं एक पाऊलही टाकलें नाहीं याबद्दल त्यांचें मनच साक्ष देत आहे. एका न्यायाधीशास साक्ष पटली नाहीं ह्मणून तेवढ्यावरूनच रा. टिळक अक्षयींचे दोषी ठरत नाहींत. न्यायाधीश तरी मर्त्य मानवच आहेत. न्याय करण्याचा ईश्वरी गुण त्यांच्या ठायीं ज्यास्त आहे असें आजचे सत्ताधीश मानतात आणि ह्मणूनच त्यांची न्यायपीठांत नेमणूक झाली आहे. तथापि कालमहिमा अगम्य आहे. आज दुसरी कांहीं परिस्थिती असती, तर मुंबई हायकोर्टापुढें आरोपी ह्मणून उभे राहिलेले रा. टिळक, अशींच अनेक हायकोर्टे स्थापन करणाऱ्यां पैकीं एक असते, असें हिंदुस्थानांतील तीस कोटी अंतःकरणांला वाटत आहे. अशा योग्यतेच्या पुरुषाला अशी भयंकर आपत्ती आली ह्मणून समाजाचें मन अत्यंत व्यथित होणें अगदीं साहजिक आहे. रा. टिळकांना झालेल्या शिक्षेमुळें समाजाच्या मनांत उत्पन्न झालेला उद्वेग वर्तमान पत्रांतील लेखांच्या रूपानें बाहेर पडला आहे. हा उद्वेग हायकोर्टाला आपली बेअदबी करणारा वाटला तथापि येथें समाजाचा निरुपाय होता, हें विसरतां येत नाहीं. कांहीं तरी प्रसंग साधून हायकोर्टाची नालस्ती किंवा बेअदबी करणें निराळें आणि अंतःकरण खरोखर आणि सकारण व्यथित झालें असतां तीव्र शब्दयोजना होणें निराळें. या भेदाचा हायकोर्टानें अवश्य विचार करावयास पाहिजे होता. वरिष्ठ न्याय मंदिराची इभ्रत राखली जावी ह्मणून त्याचे हातीं शासनाची अनियंत्रित सत्ता राहणें इष्ट आहे याबद्दल वाद नाहीं; परंतु त्या सत्तेचा उपयोग वर सांगितलेल्या विचार सरणीच्या अनुरोधानें झाला असतां तर, आह्मांला वाटतें, मुंबई हायकोर्टाची इभ्रत खरोखरच वृद्धिंगत झाली असती आणि त्याच्या न्यायीपणाची साक्ष सर्वांच्या अंतःकरणांत पटली असती. इभ्रत कमी होणें हा दृश्य प्रकार नाहीं; त्याच प्रमाणें ती इभ्रत कमी करूं जाणाऱ्याच्या अपराधाचें परिमार्जन ही दृश्य नाहीं. हा सर्व कल्पनेचा भाग आहे. कल्पनान्वित गोष्टींच्या व्यवहारांत हाय कोर्टातले न्यायाधीश निष्णांत असतात असा सार्वत्रिक समज आहे. पण दिलगिरीच्या किंवा माफीच्या प्रदर्शनानें अपराधाचें परिमार्जन होईल असा आग्रह धरण्यांत मुंबई हाय कोर्टानें काय साधलें हें आह्मांस कळत नाहीं. जर अपराध कल्पनास्वरूपी तर त्याचें परिमार्जन कल्पनास्वरूपी मार्गानें जसें होईल तसें कोणत्याही शारिरिक, सांपात्तिक किंवा शाब्दिक शासनानें होणार नाहीं. अमर्यादित कालपर्यंत बंदिवास भोगण्याची इच्छा किंवा सवड नसल्यामुळें माफीचे किंवा दिलगीरीचे चार शब्द लिहून आरोपितानें हायकोर्टापुढें सादर केले तर हायकोर्टाच्या इभ्रतीवर जो अनिष्ट परिणाम झाला तो दुरुस्त झाला असें हायकोर्टास वाटत आहे काय? आपण खरोखर व्यथित अंतःकरणानें जे शब्द लिहिले त्याबद्दल आपण न मागतां माफी व्हावी, किंवा त्याबद्दल जें शासन होईल तें भोगण्यास तयार आहों, अशा विचाराच्या सुशिक्षित गृहस्थाच्या मनावर निरुपायानें मागावयास लागणाऱ्या माफी मुळें काय परिणाम होणार! अपराधाबद्दल शासन भोगण्यास तयार असतां अधिकाराची ताणाताण करून बळजबरीनें माफी मागावयास लावण्यांत हायकोर्टानें कोणता पुरुषार्थ साधला? आपण लिहिलेली भाषा कडक आहे खरी पण कांहीं कारणामुळें ती अपवादाच्या सदरांत यावयाला पाहिजे, कोर्टास तसें न वाटल्यास आपण शासन भोगण्यास तयार आहों, अशी ज्याची मनोवृत्ती आहे त्यांचे माथीं माफीचा बोजा बळजबरीनें मारला तरी त्यांच्या अंतकरणांत बदल कोणत्या मार्गानें होईल? आणि अंतःकरणा पासून नव्हे अशी माफी घेऊन हायकोर्टाला तिचा काय उपयोग? अशी निरर्थक माफीची अट घालण्यानें मात्र मुंबई हायकोर्टानें आपणास अगदींच उपहासास्पद करून घेतलें आहे.

## महाराची शाळा

(आमच्या येथें महार लोकांस साधारण लिहिणें वाचणें यावें ह्मणून रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी व रा. ब. देवराव विनायक यांनीं गेल्या चैत्र शुद्ध १ ला महारवाड्या मध्यें एक रात्रींच शाळा काढली. ती फार चांगली चालत आहे; आणि विद्येच्या संस्कारानें या शुद्र जातींतील बुद्धिमान तरुण लोक बरेच पुढें चालले आहेत ही अभिनंदनाची गोष्ट होय. या रात्रीच्या शाळेसाठीं रा. क्राफर्ड डेपुटी कमिशनर यांनीं एक निराळी खुली जागाही दिली आहे आणि तेथें आतां छोटी टुमदार पण गरीबी विचाराची इमारत उभारण्याचा विचार आहे. या विद्यालया निमित्त कांहीं महार लोक वर्गणीची यादी घेऊन घरोंघर फिरतांना दृष्टीस पडतात तेव्हां खरोखर आनंद वाटतो) आणि असें ही वाटतें कीं अकोल्या सारख्या वस्तींत एकच काय पण तीन रात्रीच्या शाळा निघाल्या तरी त्या अवश्य आहेत. रात्रीच्या शाळा हल्लीं इतक्या उपयुक्त होतील अशी प्रथमतः कल्पना नव्हती. आणि आतां आमचा असा प्रश्न आहे कीं सरकारनें आपली विद्यादानाची जबाबदारी अजून पुरी उचलली नाहीं व प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारा संबंधानें जो सरकारचा अनुकूल ग्रह वारंवार त्यांच्या ठरावांतून बाहेर पडतो त्या त्यांच्या अभिप्रायाला क्रियेनें अस्तित्व देण्याची वेळ हीच आहे. (आह्मी तर असें सुचवितों कीं या महार लोकांच्या तशाच इतर प्राथमिक शाळांसाठीं गांवकऱ्यांच्या वर्गण्या नकोत आणि त्याकामासाठीं सरकारी पैसाच विपूलतेनें आला पाहिजे. गांवकऱ्यांच्या वर्गण्यासाठीं दुसरी प्रयोजनें पुष्कळ आहेत.) आणि जी गोष्ट सरकारच्या पैशानें व्हावयास पाहिजे तेथें सरकारनें आपलें कर्तव्य बजावण्यास पुढें येण्यास माघार घेऊं नये. (राजश्री आण्णासाहेब महाजनी यांच्या या रात्रींच्या शाळेनें सरकारची दृष्टी त्या गोष्टीकडे वळविली आहे आणि ती लवकरच लाभदायी होवो असें आह्मी इच्छितो.)

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—हस्तनक्षत्राचा तो हत्तीसारखा पाऊस अवशा पाहिजे आहे. त्याच्या त्या अमृतानें वनस्पती माल सर्व कडि नाहींशी होईल आणि नवी वार्षिक वनस्पतीची सृष्टी भावी पुष्पफलांच्या बहारीनें शेतकऱ्यांस डोलवूं लागेल. अद्याप रंग नाही.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. सब डिव्हीजनल माजिस्ट्रेट आकोला आणि रा. रा. गुरुबक्षसिंग टेलिग्राफ सुपरिनटेंडट या लोकप्रिय अधिकाऱ्यांच्या बदल्या येथून झाल्यामुळें त्यांस उद्यां येथील 'मित्रसमाजा' च्या मार्फतीनें पानसुपारी देण्यांत येणार आहे.

डा. नरहर शिवराम परांजपे यांच्यावर यवतमाळास राजद्रोहात्मक भाषणें केल्यासंबंधानें जामिनकीचा खटला चालूं आहे- आणि त्या निमित्त येथून रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई हे मुद्दाम यवतमाळास गेले होते. पण रा. परांजपे हे फार आजारी असल्यामुळें मुकदमा तहकूब आहे.

रा. रा. गोविंद नारायण काणे वकील उमरावती हे विलायतेला गेले असून तेथें जी मोठी धर्मपरिषद् गेल्या सप्टेम्बरांत भरली होती तिचे हे एक सभासद होते. निरनिराळ्या धर्मांच्या तात्विक विचारासंबंधी झालेल्या व्याख्यानांचीं हस्तपत्रकें त्यांच्या कडून आह्माकडे आलीं आहेत त्यांच आह्मी आदरपूर्वक स्वीकार करितों-

रा. रा. मोरोपंत पुरोहित ह्यांच्या वरील राज्यद्रोहाचा जामिनकीचा खटला ता. ९ रोजीं वाशिमास चालणार आहे. वाशिमचा मुक्काम राजश्री क्राफर्ड यांनीं साक्षीदारांच्या सोईसाठीं निश्चित केला पण आरोपीला किती अडचणी येतात याचा विचार अवश्य व्हावयाला पाहिजे होता.

### परम आल्हाद

दुःखाचें पर्यवसान सुखांत होणें अत्यंत मनोहर असतें. तसेंच मृत्यूची वार्ता खोटी ठरणें हेंही तितकेंच किंबहुना त्यापेक्षां अधिक उल्हासकारक वाटून मरणाच्या कल्पनेनें नेलेली दृश्य मूर्ती डोळ्याला अधीक रमणीय वाटते. गेल्या सोमवारीं आमच्या येथील प्रसिद्ध व्यापारी राजश्री नथमल सोमाणी हे मृत झाल्याची खबर आह्मी प्रसिद्ध केली होती. ती खोटी आहे. त्यांच्या ओळींतील दुसरे एक गृहस्थ मृत झाले असून त्यांच्या ऐवजीं यांच्याच नांवाची कर्णकटु बातमी लोकांच्या तोंडी पसरली. आणि त्यामुळें असा प्रमाद घडला या बद्दल आह्मांस फार खेद वाटतो. राजश्री नथमल सोमाणी हे सुखरूप आहेत. त्यांची शरीर प्रकृती चांगली आहे आणि त्यांच्या आप्तमित्रांस वर्तमानपत्रांतील बातमीनें झालेलें दुःख कोट्यावधी पटीनें या खुशालीच्या बातमीनें हलकें होईल. आमच्या हिंदुधर्मीतील वाडवडिलांच्या समजुती प्रमाणें राजश्री नथमल हे दीर्घायु होवोत असें आह्मी परमेश्वरापाशीं मागतों.

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडवा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडवा फार चांगला कापल जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पंसत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही
जहागीरदार सीप रायी ( ग्वालेर ) श्रीमंत मानासाहेब फाळके दफ्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

**सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.**

स्थापना सन १९०७

**भांडवल एक लक्ष रुपये.**

**प्रत्येक भाग २५ रुपयांचा**

**याप्रमाणें एकंदर भाग ४०००.**

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून

**पी. सी. जोगळेकर आणि कंपनी म्या. एजंटस्**

नं. १३


## दवाखाना.

आमचे दवाखान्यांत सर्व तऱ्हेच्या वनौषधी, मात्रा, गुटिका, चूर्ण वगैरे विक्रीस तयार आहेत. बाळांतरोग, गर्मी परमा, मुळव्याध, कवळ, पानथरी, हरतऱ्हेचे हिवताप इ. रोग कळविल्यास परिक्षा करून अनुभवीक औषधें माफकदरानें पाठवूं. घरीं बोलविल्यास वेगळी फी घेतली जाईल. गजकर्ण मलम ॥= बाटली ॥६.

शिवचरणगीर रामगीर वैद्य, कुरणखेडकर
दवाखाना शहर आकोला

दोन घडयाळें एकदम बोलाविणारांस पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिश्या बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस साखळी सुधां शिशीस ।.



रास्कोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घडयाळ रु. १४ सोल्जर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि क.
नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकाविले जाईल दर माफक असून वक्तशिरीं काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. व हेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरुस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब. सायकल टीचर.

पत्ता:----
अहमद अली कासमजी बोहरा
नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

नाहि सत्यात् परोधर्म

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व वक्तशिर पाठवीलाजाईल. आह्मांस शेंकडों पत्र आलीं आहेत.

पत्ता:—
श्रीनिवास बाळकृष्ण होळे जनरल मर्चंट व कामशन एजंट.
नं ७२ येवले.

## नोटीस

बेशमी गणु वल्लद असाजी राहणार खिरोड तालुके जळगांव पोष्ट पातुर्डा.

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमच्या जवळून शेत सर्वे नं २५ अंदाजा १८ एकर पैकीं ८ एकर २००० रुपयांस पिकासकट विकत घेतले. व त्या बद्दल २५ तोळे वजनाचें चांदीचें कडें चौघासमोर विसार ह्मणून दिलें. पुढें खरेदीखत करण्याकरितां आलों असतां तुह्मी ह्मणतां कीं शेत पिकासकट न देतां आह्मी तें काळें २००० रुपयाला देऊं तुह्मास घेणें असेल तर घ्या नाहींतर आपला विसार वापस घेऊन जा. सबब नोटीस देण्यांत येतें कीं तुमचा आमचा सौदा पक्का झाला आतां तो बदलूं शकत नाहीं. तर ही नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसांच्या आंत शेत खरेदी करून द्यावें व आपले रुपये घ्यावेत. असें जर मुदतींत झालें नाहीं तर आह्मांस योग्य कोर्टामार्फत ताबा घ्यावा लागेल. मग त्यास लागणारा सर्व खर्च तुमच्या जवळून या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेऊं. कळावें. ता. ३०-९-०८ इ०

सही
किसन वल्लद हरी अढाऊ राहणार खिरोड तालुके
नं. घ. ४८ जळगांव नि. खु.

## नोटीस

बेशमी गिरजी मर्द शामु सुतार राहणार उकडगांव ता. जळगांव पोष्ट—तामगांव.

ईस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमच्या जवळून ता. १९ माहे सप्टेंबर सन १९०८ रोजीं मौजे उकडगांव येथील शेतसर्वे नं २० एकर ७॥१४ आकार रु १७॥४ याचें खाते नामदेव मारोती याचे नांवें आहे व शेतसर्वे नं २ एकर १५॥२ आकार रु. २१॥९ यांतील चवथाहिस्सा याचें खातें तुह्याच नांवानीं आहे व मौजे जस्तगांव येथील शेतसर्वे नं १० एकर ३०॥१४ आकार रु. ७९ यांतील सातवा हिस्सा खातेदार चंद्रभान वल्लद लक्ष्मण पाटील हा आहे. ही वरील शेतें १३५० रुपयास उभ्यापिकासह खरेदी ठरवून १०० रुपये विसार देऊन त्याच दिवशीं तामगांव मुक्कामीं स्टॉप घेऊन रजिस्टर कचेरींत नोंदणीस जाण्याकरितां तामगांव मुक्कामीं गेलों होतों. पण त्या दिवशीं स्टॉप न मिळाल्यामुळें आपण परत आलों. दुसऱ्या दिवशीं रविवार होता. सोमवारीं तुह्मांस तामगांवास येण्याविषयीं ह्मटलें असतां तुह्मी उडवाउडवीचीं उत्तरें देऊन खरेदी देत नाहीं ह्मणून सांगितलें. तर या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं ज्या अर्थी तुह्मी विसार घेतला त्या अर्थी आमची खरेदी पक्की झाली. तर आतां तुह्मी नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत तुमची शेतें श्रीराम शालीग्राम, गुलाबचंद चिमणीराम यांच्यापाशीं गहाण आहेत त्याच्या पावत्या घेऊन येऊन खरेदी नोंदून द्यावी. असें जर मुदतींत केलें नाहीं तर कोर्ट मार्फत सर्व व्यवस्था केली जाईल व त्यास लागणारा सर्व खर्च या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेतला जाईल. कळावें. तारीख २०-९-०८ इ०

सही
रामलाल हेमराज मारवाडी राहाणार मनार्डी ता० जळगांव
नं. घ. ४९ पो. तामगांव द. खु.

## नोटीस

गिरनी मर्द मारुती तेली वस्ती मलकापूर

ईस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमची ता. २३-९-०८ ची नोटीस पोहचली तुह्मी मुखत्यार पत्र रद्द केलें असें लिहिलें आहे तर तुमच्या कामाची आह्मांस जरूर नाहीं. फक्त तुह्मी १ वर्षाच्या शर्तीवर १५० रुपये पगारावर मला मुखत्यार पत्र दिलें होतें आणि त्याप्रमाणें मध्यंतरी न सोडण्याचा करारहि केला होता. लेखी मुखत्यार पत्र देण्यापूर्वी तुह्मी ३ महिने माझे कडून कामगिरी करून घेऊन ती पसंत करून नंतर मला मुखत्यार नेमलें होतें. असा खरा प्रकार असतानां व आह्मी कोणतेही प्रकारें नुकसान केलें नसतांहि तुह्मी आमचे संबंधानें फार कमीपणाचा मजकूर लिहिला आहे. तथापि तुमची चाल चलणूक कशी आहे हें आतां चांगलें दिसून येत आहे. तुह्मी निशाणी घेऊन व चार वाईट लोकांच्या सांगण्यावरून नोटीस दिली असावी असा तर्क आहे. तरी ही नोटीस पोचल्यापासून ८ दिवसांचें आंत माझे एक वर्षाचे पगाराचे रुपये १५० मला देऊन पावती घ्यावी. रुपये न दिल्यास तुमच्यावर दिवाणींत दावा करून कोर्ट खर्चासह रुपये भरून घेतले जातील व तुह्मी जो माझ्यावरती दोष लाविला आहे त्याबद्दल तुमचा जबाब योग्य वेळीं घेतला जाईल. आणि तुमच्या नोटिशीमुळें जी कांहीं काम धंद्याची माझी नुकसानी होईल तीही नुकसान तुमच्या शिरावर आहे. कळावें ता. २९-९-१९०८ इ०

सही
लक्ष्मण मल्हारी हिंगे राहणार मलकापूर निशाणी खुद.
नं. घ. ५०

## जाहिरात

जाहिरात तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, दानी जानकीराम भुसारी राहणार खामगांव याजला ता० ११-११-०५ इ० रोजीं मुखत्यार पत्र दिलें होतें. तें मुखत्यारपत्र आह्मी ता० १७-९-०८ इ० रोजीं रद्द करून नोकरी वरून सोडले आहे. तर आमचे दुकान संबंधी सदर्हू इसमाशीं व्यवहार करूं नये, केल्यास त्याचेबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. कळावें. तारीख १७-११-०८ इ०

सही
सेवाराम शिवरतन दुकान खामगांव द. खु.
द० रामनारायण सांडके
नं. घ. ५१

## आर्यवनौषधालय मुर्डी

हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यानकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची ओषधें वारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शेंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक, रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातू तो शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. तो दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसात एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनाने नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधूमेह जुनाट परमा, मुष्ठीमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खर्च सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दर:-एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६९ गो. ४ रु. २७९ गो० ६ रु. ५९० गो० रु.

२ अपूर्व नेत्राजन:-यानें पडस, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, व इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरा रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:--कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ ११ मार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पूड:-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे .

५ विंचूचें विष:-औषध लावतांच उतरतें मुर्की ३ तो. ८ आणे

६ गजकर्ण:-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:-औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुन: उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनी संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, घात घडू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

२ सामानाचा मोठा क्याटलाग मागव तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म धाक. गुटिका, आसव, तेलें, सूगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्च सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावा आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १९।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्येक ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यासआमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावी, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळन हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**



## OR!ENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established 1874.*

*HEAD OFFICE*—**BOMBAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amou to a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if I miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay nd terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hrough decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others* mploying a portion of their annual income or profits in effecting f once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he di seearly, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes hupuismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of t he step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained n application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

No. 2


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १२ माहे अक्टोबर सन १९०८ इसवी [ अंक ३९



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ऑळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः—— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर सालदर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A Phillips
आकोला ९।९।०९ } एजंट
नं ७१



## बंगला विकाऊ

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर डिस्ट्रिक्ट जज्ज चांदा, मध्यप्रांत यांचा आकोला येथील बंगला विकावयाचा आहे. जनरल पोस्ट आफिसा समोरील विस्तीर्ण मैदानावर उभा आहे. ग्राहकांनी विशेष विचारपूस खालीं सही करणाऱ्याकडे करावी. ता० १८-९-०८ इ०

नारायण खंडेराव फडके
नं. व. १९ वऱ्हाडसमाचार आकोला


## वर्तमानसार

### धुगांव ता० उमरावती

( इंद्रवज्रा )

तूकेश्वरा पासुनि तूरग्राम ।
त्याचा अपभ्रंश धुगांव नाम ॥
वसे पयोष्णी तिरिं हेंचि पाहा ।
सुखें आनंदे तरी यांत राहा ॥ १ ॥

### पयोष्णी

( भुजंग प्रयात )

निघे सप्त पूटाहुनी ही पयोष्णी
असें शीत वारी वहूनीत उष्णीं ।
तयाहूनि भारी असे वृष्टिकाळीं
जगा ही दिसे उग्र कर्पेचि काली ॥१॥
पुरा बोलती दुग्धधाराचि वाहे
परी ही तया साक्ष कांहींहि न राहे ।
असे स्वच्छ दुग्धापरी हींत पाणी
करं या नमस्कार जोडूनि पाणी ॥२॥

### निंभळ ता० उमरावती

( चामर वृत्त )

तीन कोस येथुनी निभळ ग्राम चांगलें
येथ अम्बुका वसे तिचें पदींही रंगलें ।
चित्त आण तीं करील दूर घोर आपदा
स्वस्थ भावनें करून लागती सदा पदा ॥

### सोलापूर

( अनुष्टुप )

एक कोस उणें दोन योजनांन्तारि हें पाहा
सोलापूर वसे कोरेश्वर महात्म्य-हीं पहा ।
रीणमोचनीं साक्ष हा पहा
स्थान त्या स्थळीं जो करी महा
पुण्यवंत जो घेई दर्शना
ईश तो करी पूर्ण कामना ॥

### शिंगणापूर

आर्या

बकर्भाम भीमकर्पे अवतरला शिंगणापुरी काळा
स्मरतां ढडकरि वार्वे चुकवी भाति दुष्ट उग्र त्या काळा ।

नागपूर जिल्ह्यांतील नोहरा गांवीं स्वदेशीचा उपदेश करणारे रा. अप्पासाहेब हाळदे व इतर तीन गृहस्थ यांजवर इ. पी. कोडाच्या १४७ व २९६ कलमान्वयें खटले होऊन त्यांस सहा सहा महिन्यांच्या शिक्षा देण्यांत आल्या होत्या. वरील शिक्षेविरुद्ध करण्यांत आलेल्या आपिलांत डि. मॅजिस्ट्रेटांनीं खालील कोर्टाचा ठराव कायम केला व आरोपींस वरील कलमांन्वयें देण्यांत आलेली तीन तीन महिन्यांची शिक्षा वाढवून चार चार महिन्यांची केली. मात्र दोनही कलमान्वयें झालेली शिक्षा एकाच वेळीं भागण्याचें ठरविल्यामुळें आरोपींस सहा महिन्यांच्या ऐवजीं चारच महिन्यांची शिक्षा भोगावी लागणार आहे.

ढाका येथें दुर्गापूजोत्सवाच्या शेवटच्या दिवशीं हिंदु लोकांची मिरवणूक नदीच्या बाजूनें परत येत असतां हातीं लाठ्या घेत लेल्या मुसलमान लोकांच्या मोठ्या जमावानें मिरवणुकीतील लोकांवर हल्ला केला. व त्या योगानें त्यापैकीं पांच जणांस भयंकर दुखापती होऊन त्यांस तावडतोब दवाखान्यांत पोहचवावें लागलें. पोलिसांवरही हल्ला करण्यांत आल्यामुळें त्यांना दंगेखोरांस तात्काळ पकडतां आलें नाहीं. दंगा करण्यांत सामील असल्याच्या आरोपावरून हल्लीं १२ मुसलमानांवर खटला करण्यांत आला आहे.

अलिगड कालेजच्या ट्रस्टींचे आनररी सेक्रेटरी नबाब मुशताक हुसेन यांनीं सदर्हू संस्थेंतील विद्यार्थ्यांना 'डिबेटिंग सोसायटी' त राजकीय विषयावर चर्चा करण्याची परवानगी दिली होती. ही परवानगी त्यांनीं आतां रद्द करून विद्यार्थ्यांना राजकीय चर्चा करण्याची मनाई केली. इतर ट्रस्टींची अशी इच्छा नव्हती; परंतु त्यांच्या म्हणण्यास नबाब साहेबांनीं मान दिला नाहीं.

( ता.१ ) रोजीं दोन प्रहरीं नार्कोलडांगा येथील ओरिएन्टल कंपनीच्या गॅसवर्क्समध्यें जे. बी. हसिक नांवाच्या इसमास बंदुकीची गोळी लागून तो ठार झाला. हसिक यांनीं गोळी घालून घेऊन आत्महत्या केली अशी गॅसवर्क्स कंपनीचे मि. पामर यांनीं बेलीघाट पोलिसठाण्यावर प्रथम वर्दी दिली होती, परंतु त्यानंतर थोड्या वेळानें त्याच कारखान्यांतील फील्ड नांवाचा इसम पुढें आला व त्यानें पुढील आशयाची जबानी दिली:— मी एक भरलेली बंदूक उचलली तेव्हा ती अकस्मात उडाली व तिची गोळी हसिक यांस लागली. हसिक यांस औषधोपचारासाठीं तावडतोब कॅम्बल हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें; परंतु त्याच दिवशीं सायंकाळीं येथें ते मेले. या बाबतींत पोलिसनें केलेल्या तपासावरून ही गोष्ट आकस्मित रीतीनें घडून आल्याचें सिद्ध होत आहे.

हैदराबादहून आलेल्या ताज्या तारेवरून समजतें कीं, तेथील स्थिति पुष्कळ सुधारली असून विपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठीं बरीच रक्कम हातीं आली आहे. तेथील प्राणहानिसंबंधानें प्रसिद्ध झालेले आंकडे पुष्कळच अतिशयोक्तीचे आहेत. हैद्राबाद संस्थानच्या नोकर लोकांनीं जी निष्ठा व स्वार्थत्याग दाखविला, त्याची करावी तेवढी स्तुति थोडी आहे.

नेटलहून परत येत असतां व्हॉक्सरस्ट येथें बॅरिस्टर गांधी व दुसरे पांच हिंदी गृहस्थ यांना ट्रान्सवाल सरकारानें कैद केलें.

तुर्कस्तानच्या सार्वभौमत्वाखालीं असलेल्या बल्गेरिया प्रांतानें आपल्या स्वातंत्र्याची द्वाही फिरविली आहे. या प्रांतांत गोरे लोक रहातात. बल्गेरियानें आपल्या स्वातंत्र्याचा हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यामुळें युरोपीयन वातावरणांत खळबळ उडाली आहे व युरोपमध्यें तोफांचा गडगडाट व तरवारींचा खणखण नाद ऐकावयाचा प्रसंग येतो कीं काय असें वाटूं लागलें आहे. तुर्कस्तानचें पुनरुज्जीवन होऊन तुर्की राज्यपद्धतीची पुनर्घटना चालली आहे. 'तरुण तुर्कींचा पक्ष' मोठ्या हिंमतीनें व कर्तबगारीनें मदमंदी साम्राज्याचा पाया दृढ करण्याची खटपट करीत आहे अशा वेळीं म्हणजे तुर्कस्तान आत्मसुधारणेंत गुंतलें असतांना संधी साधून बल्गेरीयानें आपल्या स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिद्ध करून तुर्कस्तानचें सार्वभौमत्व झुगारून दिलें आहे.

पंढरपूर येथें थोड्या दिवसांपूर्वी दोन मिशनरी स्त्रियांस मारहाण केल्याबद्दल ज्या लोकांवर खटला करण्यांत आला होता, त्यांस पुढीलप्रमाणें शिक्षा देण्यांत आल्या आहेतः— सहा इसमांस दोन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा व रु. १०० दंड एकास दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा व एक हजार रुपये दंड व सात इसमांस प्रत्येकीं अकरा फटक्याची शिक्षा देण्यांत आली व एकाचा सहा महिन्यांचा त्याच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल जातमुचलका घेण्याबद्दल हुकूम करण्यांत आला. ज्यांस फटक्यांच्या शिक्षा सांगण्यांत आल्या त्यांस कोर्ट व सर्जन यांच्यासमक्ष फटके मारण्यांत आले. कोर्टांत बरीच गर्दी जमली होती.

संयुक्तप्रांतांतील यंदाच्या दुष्काळाचा परिणाम नेपाळच्या व्यापारास किफायतशीर झाला आहे. नेपाळमध्यें भाताचें पीक उत्कृष्ट आलें होतें. नेपाळमधून सुमारें ५००० टन भात संयुक्तप्रांतांत आयत करण्यांत आलें व तांदुळही नेहमींच्या दिडपट आयात झाले. आयात झालेल्या मालास संयुक्तप्रांतांत भावही चांगला आल्यामुळें नेपाळचा चांगलाच फायदा झाला.

रा. टिळक यांच्या स्वयंपाकाची व्यवस्था करण्यासाठीं ना. गव्हर्नरसाहेबांनीं येरवडा येथील तुरुगांतील एका ब्राह्मण कैद्याची मंडालेस रवानगी केली आहे.

**मँगनीज ओरः**— ८९ लक्षांची मँगनीज धातु निर्गत झाली. पैकीं ६८ लक्षांचा मुंबईहून रवाना झाला. मुंबईचा माल ग्रेट ब्रिटन, अमेरिकेतील स्वतंत्र संस्थान व बेल्जिअम येथें रवाना झाला.

**अळशी:**– ४.७८ कोटींची निर्गत झाली. ग्रेट ब्रिटनमध्यें १.६७ कोटींची, फ्रान्समध्यें १.२९ कोटींची, जर्मनीत ६० लक्षांची, इटालींत ४९ लक्षांची बेल्जिअममध्यें ११ लक्षांची, हालंडमध्यें १७ लक्षांची आस्ट्रियांत १३ लक्षांची निर्गत झाली.

दार्जिलिंग मेलगाडींतील दोन युरोपियनांवर हल्ला केल्याच्या आरोपावरून शिक्षा झालेले बाबू दुर्गाचरण संन्याल हे वेडे झाले असून त्यांना तेथील प्रेसिडेन्सी जेलमधून योग्य बंदोबस्तानें ढाक्का मधील रेफॉर्मेटरीमध्यें रवाना करण्यांत आलें आहे.

विश्ववृत्त प्रकरणांतील महत्वाचे कागदपत्र तेथील सेशन्स जज्जाकडे येऊन दाखल झाल्यामुळें आरोपींच्या ( मुद्रक रा. जोशीराव व संपादक रा. जोशी व प्रो. विजापुरकर ) वतीनें केलेले जामीनअर्ज सुनावणीस निघाले. आरोपींची विद्वत्ता, त्यांचा समाजांतील दर्जा व ते स्वतः वारंटावाचून हजर झाले या गोष्टी कोर्टाच्या नजरेस आणण्यांत आल्या तथापि त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. खटल्यास लवकरच सुरुवात होणार असल्यामुळें जामीन अर्जाचा विचार करण्याचें कारण नाहीं असें जज्ज ह्मणाले.

'विश्ववृत्त' पत्रावरील राजद्रोहाच्या खटल्यांतील प्रो. विजापूरकरआदि आरोपींना जामिनावर सोडण्यासंबंधीं अर्ज सेशन जज्जांनीं नामंजूर केल्यावर आरोपी तर्फेचे दोन वकील महाराजसाहेबांकडे जामिन अर्ज घेऊन गेले. महाराजसाहेबांनीं जामीन अर्ज मंजूर करून आरोपींना जामिनावर सोडण्याचा हुकूम केला. प्रत्येक आरोपीकडून दहा हजारांचा जामीन व दहा हजारांचा जातमुचलका घेण्यांत आला.

दक्षिण हैद्राबाद येथील जलप्रलयामुळें निराधार झालेल्या लोकांच्या मदतीसाठीं फंड जमविण्याचा उद्देशानें तेथील रेसिडेंटसाहेबांनीं एक सभा भरविली होती सभेस सुमारें ५ हजार लोक हजर होते. सभेतल्या सभेंत २२ हजार रुपयांचें आंकडे पडले. याशिवाय निजामसरकारानें आपल्या खाजगी मिळकतींतून चार लाख रुपयांची मदत केली असून संस्थानकडून दररोज ३० हजार मनुष्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था होत असते.

कलकत्ता येथील पोलिस कमिशनर साहेबांच्या सहीनें कलकत्ता गॅझेटमध्यें एक जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे. एखाद्या मिरवणुकींतील किंवा सभेंतील कोणत्याही इसमानें लाठी किंवा वेणेकरून दुसऱ्यास अपाय होईल अशा प्रकारचें हत्यार घेऊन सार्वजनिक रस्त्यानें, घाटांवर, बंदरावर, किंवा सार्वजनिक ठिकाणीं जाऊं नये अशी वरील जाहिरनाम्यानें मनाई करण्यांत आली. या जाहिरनाम्याची अंमलबजावणी बंगभंगाच्या वाढदिवसापासूनच ह्मणजे ता. १६ आक्टोबर १९०८ पासून व्हावयाची आहे.

# टिळक डिफेन्स फंड.

केसरीवरील दुसऱ्या खटल्याचें आजपर्यंतचें काम लोकमान्य **टिळक** यांनीं स्वतःचालविल्यामुळें लोकांकडून आश्रय मागण्याची जरूरी पडली नव्हती. आतां यापुढें प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करण्याचा शेवटचा उपाय करून पाहावा, असें कायदे जाणणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या हितचिंतकांचें ह्मणणें पडल्यावरून प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करण्याचें ठरविलें आहे. याकामीं सुमारें २०-२५ वीस पंचवीस हजार रुपये खर्च येईल असा अदमास आहे. एवढें ओझें केसरीवर टाकून भागणार नाहीं. ह्या फंडासंबंधानें खाजगी रीतीनें कांहीं रक्कम गोळा करण्यांत आली आहे.; पण कोणावरही विशेष ओझें पडूं नये, या हेतुनें हें विनंतीपत्र काढिलें आहे.

केसरीवरील वर्गणीदारांनीं प्रत्येकीं १ रुपया जास्त देण्याचें मनांत आणलें तरी ही रक्कम सहज जमा होण्यासारखी आहे. तरी केसरीचे वर्गणीदारांनीं व लो. टिळक यांजविषयीं ज्यांना सहानुभूती असेल त्यांनीं आपापल्या सोईप्रमाणें तावडतोब रक्कम पाठविण्याची मेहेरबानी करावी.

वर्गणी पाठविणें ती **केसरी** म्यानेजर **पुणें** किंवा **राष्ट्रमत** म्यानेजर **मुंबई** यांजकडे जमा करावी. जमलेल्या रकमेचा खर्च लो. टिळक यांचे स्नेही व सल्लागार मार्फत होईल; व पुरेशी रक्कम जमतांच वर्गणी घेण्याचें बंद केलें जाईल.

नरसिंह चिंतामण केळकर.
कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर.

## सुविचार समागम.

**हिंदुस्थान रिव्हू**— या मासिकाच्या आक्टोबरच्या अंकांत मि. ऑक्स्फील्ड यांच्या एका लेखाला प्रधान स्थान दिलें आहे. तिबेटसंबंधीं राशिया व इंग्लंड यांमध्यें झालेला तह व त्याचा हिंदुस्थान सरकारशीं— हिंदुस्थानाशीं नव्हे—संबंध यांचा ऊहापोह या लेखांत केला आहे. तिबेटांत इंग्लंडचें वर्चस्व राशियापेक्षां जास्त रहावें असा हट्ट प्रधान मंडळानें धरला नाहीं हें बरें केलें नाहीं, कारण इंग्लंडच्या सुधारणेच्या प्रवेशानें अडाणी तिबेटी लोकांच्या मानेवरील ताशीकामाचें जूं खालीं पडावयास पाहिजे आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. हेतु स्तुत्य आहे.

आशियाखंडांत आजपर्यंत अनियंत्रित राजसत्ता अव्याहत मान्य होत आलेली असून आतांच सर्व देशांत सुव्यस्थित व समदर्शीर प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति हवी असें लोकांस कां वाटूं लागलें याचें स्पष्टीकरण मि. सिडने ब्रूक्स यांनीं केलें आहे. त्याचें असें ह्मणणें आहे कीं आशियावरील युरोपियनांचें वर्चस्व एकदां कमी झालें ह्मणजे कांहीं भौतिक शास्त्रांखेरीज युरोपियनांच्या संसर्गाचा मागमूसहि आशियांत रहावयाचा नाहीं. पण युरोपियनांच्या भिक्षुकी मारवाडी दंडेफराशी काव्याला तोंड देण्याला प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतिच अवश्य आहे, असें आशियांतील लोकांची पक्की कल्पना झालेली आहे.

हिंदुस्थानांत एक भाषा कोणती व्हावी या प्रश्नाचा खल मि. व्ही. एन्. मेहता आय्. सि. एस्. यांनीं केला आहे. त्यांच्या मतें अकबरच्या कारकीर्दीपासून सुस्वरूपास आलेली राजा तोडरमल्लजींची 'हिंदुस्थानी' भाषा ही सर्व भरतखंडाची एकभाषा होणें शक्य आहे. या भाषेचें व्याकरण ठरलेलें आहे. लिपी देवनागरी किंवा आरबी असावी. या भाषेंत आरबी व फारशी शद्बांचा भरणा फार आहे. पण त्याची दुरुस्ती कशी करावी याचा खुलासा प्रस्तुत लेखांत नसून टकट ती दुरुस्ती अशक्य आहे असें सुचविलें आहे. यावेक्षां 'हिंदी' भाषा अधिक सोईची होणार नाहीं काय ?

मुलाच्या आयुष्यक्रमाच्या तयारीला शिक्षण हें कसें सहाय्यकारी होतें याचा विचार मि. डी. जी. फ्लेमिंग यांनीं 'हिंदी विद्यार्थ्यांना' उद्देशून केला आहे. त्यांची विचारसरणी अशी आहे. जसा प्रत्येक गाडीच्या चाकांचा रस्त्यावर ठसा उमटतो तसा प्रत्येक सुविचाराचा किंवा कुविचाराचा मनुष्याचे शरिरावर देखील ठसा उमटत जातो. नुसत्या विचारानें क्रिया होत नाहीं त्याला शरीराचे अवयव अनुकूल व्हावे लागतात. ज्या ज्या विचारानें मनुष्याच्या शरीराकडून जी जी क्रिया होईल तसतसें मनुष्याचें शील उत्तम किंवा अधम बनतें.

अमेरिकेंत उद्योगधंद्यांच्या शिक्षणासाठीं गेलेल्या विद्यार्थ्यांत रेत निहाळसिंग हे फारच चाणाक्ष दृष्टीचे आणि होशी दिसतात. त्यांना अमेरिकेंत जें जें काय दिसलें त्याची बारिक माहिती मिळवून आपल्या देशबांधवांच्या उपयोगाकरितां त्यांनी प्रसिद्ध केलेली आहे. अशाच रूपाची एक लेख मालिका या अंकापासून सुरू झाली आहे. पहिल्या लेखांत येनकेन प्रकारेण आपण किंवा आपला माल प्रसिद्धिस यावा ह्मणून अमेरिकन लोक कसे आव्हाट प्रयत्न करतात याचें वर्णन आहे. हा गुण त्यांनीं अगदीं दुर्गुणाच्या सीमेपर्यंत नेऊन पोहोंचविला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या कामांत त्यांचा हात धरणारें दुसरें राष्ट्र नाहीं. या कामांत लेखक, शिल्पशास्त्री, चित्रकार वगैरेंची फार जरूर लागते. त्या सर्वांचा मुख्य हेतु हा असतो कीं मनुष्याच्या मनांत जी कांहीं स्वाभाविक जिज्ञासा किंवा गुप्ताचें ज्ञान व्हावें अशी इच्छा असते ती प्रज्वलित करून आपला माल त्याचे नजरेसमोर आणावयाचा व खप साधावयाचा.

'स्त्रीरणतंत्र' हा विषय फारच्या लेखांत पुष्कळ लोकांना उपयोगी पडतो. मि. पेस्तनजी खंडाळेवाला नांवाच्या एका विद्वान इंजिनियरांनीं या विषयावर भिन्नभिन्न मतांचें पर्यालोचन करणारा एक वाचनीय लेख लिहिला आहे. स्त्रीपुरुषे समान योग्यतेची आहेत कीं काय या प्रश्नाचीं उत्तरें ब्रह्मापतीतीतल्या सिंह आणि मनुष्याच्या गोष्टीप्रमाणें निरनिराळीं येणार हें उघड आहे. तथापि दीर्घ काळपर्यंत पुरुषांच्या अधिकाराखालीं स्त्रिया राहिल्यामुळें त्यांच्या अंगीं स्वातंत्र्या बरोबर येणारें कार्यकारित्व, उल्हास, इच्छा शक्ति, सोशिकपणा व दुसऱ्यावर वजन ठेवण्याची हातोटी हे गुण नाहींत. लेखकाच्या मतानें शारिरिक शक्तीच्या किंवा युक्तीच्या बाबतींत, राजकीय उलाढालींत, भौतिक शास्त्रांत, वा[illegible]येंत स्त्रियांनीं पुरुषांची बरोबरी केली आहे. पण लेखक प्रश्न करतात, उभयतांनीं बरोबरीनें चढाओढ चालविल्यावर स्त्रियांनीं पुरुषांकडून विशेष दक्षिण्याची आशा का धरावी! स्त्रीया जरी सध्यां परतंत्र आहेत तरी पुरुषांवर आमित सत्ता चालवीत आहेत. शिवाय स्त्रियांकडून कुलाची जेवढी मानहानि होईल तेवढी पुरुषाकडून होणें शक्य नाहीं. मग पुरुषांपासून स्त्रियांचे चालेल काय? कां उभयतांच्या स्वरूपांची एकच मूर्ति या पुढें उत्पन्न होणार आहे! हे प्रश्न अद्याप उत्तरावांचून राहिले आहेत. पण मि० खंडाळेवाला यांचे शेवटचें वाक्य विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. स्त्रियांमधून स्त्रीत्व नाहींसें होऊं देऊं नका ह्मणजे अडचणी उत्पन्न होणार नाहींत असें ते ह्मणतात. या वाक्याचा समाज सुधारकांनीं अवश्य विचार करावा.

मि० केसरी नारायण नंद यांनीं आपल्या सर्व देशभक्तांस बंडाळीच्या उद्योगापासून परावृत्त होण्याचा अंतःकरणपूर्वक व राष्ट्र आणि राष्ट्रीय संस्कृति यांना साक्षी ठेवून उपदेश केला आहे. आणि आपसांतील भेदभावरूपी शत्रूला उभयपक्षांनीं एक होऊन हाकून लावावे अशी विनंति केली आहे.

# वऱ्हाडसमाचार

आश्विन वद्य ३ शाके १८०३

## निर्यातीचे आंकडे काय सांगतात.

उद्धरेदात्मनात्मानम् या वचनाला बाध आणूं शकेल असा मनुष्य प्राणी सांपडावयाचा नाहीं. सृष्टीच्या नियमांतलें हें एक मुख्य तत्व आहे आणि तें विसरून जाऊन किंवा त्याचा अनादर करून कोणी जगांत नांदूं ह्मणेल तर त्याला तें साधावयाचें नाहीं. व्यक्तीच्या व्यवहारांत ही गोष्ट जितकी लागू आहे तितकीच ती राष्ट्राच्या व्यवस्थांतहि लागू आहे. उद्योगधंदे किंवा व्यापार-उदीम राष्ट्राला पोषक व्हावयास पाहिजे असेल तर त्या दृष्टीनें त्यांची वागणूक केली पाहिजे, हें आतां हिंदुस्थानांतील लोकांना पक्कें कळून चुकलें असल्यामुळें, पूर्वीप्रमाणें केवळ हातचालाखीनें किंवा मिथ्यावादीलानें ते आतां फसत नाहींत. देशाच्या निर्यात व्यापाराच्या आंकड्यांचे तक्ते पाहून लोकांनीं आनंदानें नाचूं लागावें ही आशा आतां व्यर्थ आहे. सरकारी अधिकाऱ्यांची आणि कांहीं गारोडी लोकांची तशी कल्पना किंवा खटपट असली तरी ती आतां फलद्रूप न होण्याचें हेंच कारण आहे. निर्यात व्यापाराचा गतवर्षीचा सरकारी रिपोर्ट पाहिला तर असें दिसून येईल कीं खाण्याच्या उपयोगी जें एकंदर जें धान्य परदेशीं गेलें त्यांत शें. ६४.९ इतका फक्त तांदूळ होता. तांदुळांची निर्यात

इतक्या विलक्षण मानानें वाढल्यामुळें कलकत्ता व रंगून येथें शें. १९ इतका तांदुळाचा भाव कायमचा वाढून बसला आणि दुष्काळग्रस्त प्रदेशांतील लोकांची विपत्ती अधिकच वाढली. गव्हाचें निर्यातीचें प्रमाण शें. ३३ आहे. गव्हाची पेरणी होण्याचें क्षेत्र वाढलेलें आहे खरें, पण त्या बरोबर निर्यातहि वाढली. शेवटीं देशांत काय राहिलें? अफगाणिस्थानच्या अडाणी झटल्या जाणाऱ्या राज्यांत सुद्धां देशांतून निर्यात होणाऱ्या अन्नोपयोगी धान्यावर जबर जकात आहे. पण हिंदुस्थानाच्या सुधारलेल्या राज्यांत सर्वांना 'आवजाव, घर तुमारा' आहे. हिंदुस्थान देशांतील आयात निर्यात व्यापाराचे आंकडे सालोसाल फुगलेले दिसत चालले तथापि लोक जास्त सुखी किंवा संपन्न झाले नाहींत हें प्रमाणसिद्ध आहे. पण लक्षांत कोण घेतो! कपाशी वगैरे पिकांच्या ऐवजीं अन्नोपयोगी धान्याचीं पिकें काढण्याकडे लोकांची प्रवृत्ति वाढत आहे आणि तसें होण्याला कारणहि तसेंच सबळ आहे. लोकांना निरुपायानें तसें करावें लागत आहे. आणि तसें करून सुद्धां ज्या दुष्काळाला ते भितात तें त्यांच्यापुढें सतत उभेंच आहे, हें काय अधिकाऱ्यांना कळत नाहीं! देशांत अन्नाचा दुष्काळ पडतो अशा समजुतीवर, कांहीं झालें तरी निदान धान्य जास्त उत्पन्न करून ठेवूं, मग त्यांतून येवढें तेवढें तरी प्रत्येकाला मिळेल; अशा कल्पनेनें शेतकरी धान्याचीं पिकें जास्त काढूं लागले आहेत. त्यांचा हेतु किती स्तुत्य आहे; पण ही सर्व खटपट पालथ्या घागरीवरल्या पाण्याप्रमाणें वांया जात आहे हें त्या बिचाऱ्यांना काय माहीत? ते लोक घागरींत पाणी सांचण्याच्या हेतूनें सारखें खपत आहेत. पुष्कळसे श्रम केल्यानंतर घागरींत पाणी किती सांठलें ह्मणून पहातात तो काय? घागरींत एक थेंबहि नाहीं! हें झालें कसें? त्यांनीं बारकाईनें पाहिलें तर त्यांना लागलीच उमगून येईल कीं कोणी तरी आपल्या नकळत घागर पालथी घालून, वरून पडणाऱ्या पाण्याचा प्रवाह दुसरीकडे वळवून दिला आहे. साधारण लोकांनाहि हें प्रत्यक्ष पाहिल्यावर उमगून येईल खरें पण तें उघडपणें बोलण्याची आमच्या सारख्यांना चोरी आहे. ह्मणून आह्माला असें ह्मणणें भाग आहे कीं लोकांची अन्नोत्पादक धान्य उत्पन्न करण्याची प्रवृत्ति कोठीं यशस्वी कां होत नाहीं याचा सरकारी रिपोर्टांत स्पष्टपणें खुलासा झालेला नाहीं. या विषयाकडे अधिकाऱ्यांनीं जितकें लक्ष अवश्य दिलें पाहिजे तितकें तें देण्यांत येत नाहीं. रिपोर्टांत या संबंधानें इतकेंच ह्मटलें आहे कीं, 'अन्नोपयोगी धान्यें व विशेषतः तांदूळ यांच्या भावांत तेजी झाली ह्मणून ती तशीच चालू आहे. पाऊस पाण्याच्या प्रतिकूलतेमुळें असें झालें, असें सर्वस्वी ह्मणतां येत नाहीं. तथापि या कारणांचा विशेष खल कोठेंही झाला नाहीं.' आह्माला वाटतें, आणि लोकहि अशीच अपेक्षा करतील, कीं जर सरकारनें व्यापारी व सांपत्तिक बाबींसंबंधाच्या खात्यांचा कांहीं उपयोग करून घेणें शक्य असेल तर तो या व अशा प्रश्नांत अवश्य झाला पाहिजे.

मनुष्यांना आवश्यक अशा अन्नाची जी स्थिति आतां पर्यंत सांगितली तीच जमिनीच्या अन्नाचीहि आहे. काळी आमची अन्नदाती खरी, पण तिलाहि अन्न लागतेच. तिचें पोट भरल्याखेरीज आह्मांला तिच्यापासून अन्न कसें मिळावें? उपासमारानें जर्जर झालेल्या मातेकडून मुलाचें पोषण कसें व्हावें? हाच प्रसंग आज हिंदुस्थानच्या काळीमातेवर आहे. तिला पुष्टि आणणारे पदार्थ आमच्या पासून दूर दूर जाऊं लागले आहेत. पिकांचें क्षेत्र वाढलें, शेतकी सुधारली, वगैरे लांब लांब गप्पा हव्या तितक्या ऐकावयास मिळतात. पण जमीन सुपीक करण्याची काय विशेष तजवीज होत आहे, त्याचा खुलासा मात्र कोणीच करीत नाहीं. घटकाभर असेंहि धरून चालूं कीं शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणें सुद्धां जमीन सुपीक करण्याचा प्रयत्न करीत नाहीं. पण तें कबूल केल्यावर सुद्धां आह्माला वाटतें जमिनीला कस आणणाऱ्या द्रव्यांची अप्रतिबद्ध निर्यात चालूं कां आहे याचा जाब मागण्याला लोकांना अधिकार आहे. शेतकऱ्यानें आपली जमीन जास्त सुपीक करावी अशी सरकारची इच्छा आहे आणि ती वारंवार कानावर येते ही. पण अमुक एका द्रव्याचा जेथल्या तेथेंच जमीन कसदार करण्याकडे उपयोग करावा अशी शास्त्रोक्त शिफारस करण्यांत येते, त्या द्रव्याची पोती भरून अन्य स्थळीं जाऊं नयेत अशी तजवीज कांहीं मर्यादेपर्यंत तरी कां होत नाहीं हा प्रश्न उत्पन्न होतोच. रिपोर्टाकडे पाहिले तर साल्टपीटर सारख्या अत्यंत उपयुक्त द्रव्यांची निर्यात वाढत्या प्रमाणावर आहे. आणि या द्रव्यांची तर देशांत फार जरूर आहे. या दोन परस्परविसंगत गोष्टींचा मेळ बसतो कसा? पण व्यापारखातें असें ह्मणेल कीं खाणींतून मालाची पैदास जास्त होत गेली तशी निर्यातहि वाढली, त्यांत तुमचें शेतकऱ्यांचें काय नुकसान झालें? पण शेतकरी उत्तर देतील, सरकार आपण ह्मणतां तें सरळ आहे, पण हिंदुस्थानांत निकस झालेली जमीन इतकी आहे कीं येथील खाणींत निघणारी सर्व द्रव्य येथें खपविलीं तरी पुरे पडणार नाहींत. कपाशीची सरकी निर्यात होण्याचें मानाहि वाढतेंच आहे. हो सरकी मुख्यत्वेंकरून ब्रिटन, अमेरिका व इजिप्ट येथें जाते. तेथें तिचें तेल काढतात. पेंड गुरांना चारतात, किंवा तिचा कागद करतात. शेवटीं दुसरा कांहींच उपयोग न करतां आला तर त्यांत दुसरी कांहीं भेसळ करून साबण बनवितात. ज्या यंत्रसामग्रीनें कपाशीच्या सरकीचा साबण करतां येतो ती इकडे कांहीं कांहीं ठिकाणीं आणलेली आहे आणि त्या कामांत यशहि येत आहे. कांहीं वर्षांपूर्वीं सरकारनें असें कारण पुढें केलें होतें कीं हीं यंत्रें हिंदुस्थानांतील सरकीला उपयोगी पडणार नाहींत. पण आतां हातच्या कांकणाला आरशाची जरूर उरली नसून सुद्धां त्या यंत्रांचा प्रसार व सरकीच्या निर्यातीला आटकाव होत नाहीं. न करत्याचा वार शनिवार, दुसरें काय? सरकीखेरीज एरंड्या, भुइमूंग इत्यादि गळिताच्या धान्यांचा प्रकार असाच आहे. एरंड्या व भुइमूग या दोहोंच्या भुशाचा व पेंडीचा शेताला खतासारखा फार उपयोग होतो हें प्रसिद्ध आहे. पण दुसऱ्याहि कारणांकरितां बाजरांत त्यांना विशेष मोल येतें. भुइमूगाचा नेहमींच्या अन्नाकडे उपयोग करण्याचा प्रघात हिंदुस्थानांत नाहीं. येथें त्याची लागवड फक्त परदेशीं पाठविण्यासाठींच होते. लागवड करण्याला रोख पैसे मिळतात हें जरी खरें असलें तरी तेवढ्यावरून अन्नोत्पादक धान्याकडून शेतकऱ्यांचें लक्ष द्रव्योत्पादक पिकांकडे कसें वळतें हें कळून येतें.

---

## राष्ट्रीय सभेविषयींचा वाद.

राष्ट्रीय सभेचा प्रश्न राष्ट्रांत द्वैत माजविण्यास दिवसेंदिवस जास्त जास्त कारण होत आहे हें पाहून कोणाचाही खेद झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. कॉनव्हेनशन कमिटीनें पसंत केलेल्या नियमान्वयें मद्रासेस प्रांतिक सभेची घटना झाली. या कमिटीनें राष्ट्रीय सभेस यंदा मद्रासेस येण्याचें निमंत्रण केलें आहे. मद्रासच्या प्रांतिक कमिटीनें राष्ट्रीय सभा बोलावली खरी, परंतु ती यशस्वी रीतीनें कशी पार पडेल याविषयीं मद्रासच्या कांहीं अनुभवी व विचारी गृहस्थास काळजी पडली होती. सुरतेचा प्रकार डोळ्यासमोर दिसत असतां राष्ट्रीय सभेची तयारी करणें कोणालाही भयघडच वाटेल. सुरतेस दळावलेले पक्षभेद अद्याप नाहींसे झाले नाहींत. तेथें कॉनव्हेनशनच्या बाजूस निवडून आलेल्या प्रतिनिधींचें मताधिक्य होतें तथापि त्या संख्येहून पुष्कळच मोठी संख्या कॉनव्हेनशनच्या विरुद्ध आहे; अशा स्थितींत राष्ट्रीय सभा सर्व राष्ट्राची सभा—कॉनव्हेनशननें सुरतेस आलेल्या प्रतिनिधींच्या मताधिक्याच्या जोरावर ठरविलेल्या नियमाप्रमाणें कशी व्हावी, हा प्रश्न फार बिकट आहे. या प्रश्नाचा जोंपर्यंत निकाल लागलेला नाहीं, तोंपर्यंत कोणत्याही शहरीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन तडीस जाणार कसें! अशा विचारानें मद्रासच्या कांहीं मंडळींनीं राष्ट्रीय सभेची ही 'ब्याद' टाळण्याचा विचार केला. ज्या विचारानें ते असें करण्यास उद्युक्त झाले तो सकृद्दर्शनीं व्यावहारिक दिसतो; पण त्यांत पळपुटेपणाचा दोष येणें अपरिहार्य आहे. सध्यांच्या स्थितींत अशी बुद्धि कोणालाही झाली असती. तेव्हां मद्रासच्या मंडळीस विशेष दोष देणें वाजवी होणार नाहीं. रावबहादुर अनंदाचालू यांच्यासारखी अनुभविक व वजनदार मंडळी हा ब्याडपणाचा मार्ग टाकून देऊन राष्ट्रीय सभा भरविण्याच्या उद्योगांत सामील झाली आहे, हें सुचिन्ह आहे. परमपूज्य दादाभाईंनीं मद्रासेस भरणाऱ्या राष्ट्रीय सभेस सर्वांनीं जावें असा उपदेश केला आहे, आणि कॉनव्हेनशनच्या नियमाविषयीं साशंक असलेल्यांनीं स्वतः नियमान्वयें आपली सही करून देऊन "आधीं केलें मग सांगितलें" असें केलें आहे. या परमपूज्य विभूतीचा हा उपदेश किती मंडळी प्रामाणिकपणानें ग्रहण करतात, हें पाहणें आहे.

पण मद्रासच्या मंडळीच्या उत्साहानें किंवा दादाभाईंच्या उपदेशानें सुद्धां मुख्य वाद मिटेल असें वाटत नाहीं. कॉनव्हेनशन कमिटीनें ठरविलेले नियम मान्य कां करावे असा प्रश्न कांहीं लोक करणारच. सुरतेस सभा मोडली तेव्हां प्रतिनिधींचें मताधिक्य आमच्या बाजूस होतें ह्मणून राष्ट्रीय सभा कॉनव्हेनशनच्या नियमाप्रमाणेंच चालली पाहिजे, त्या प्रमाणें तिला चालूं लावण्याचा अधिकार प्रतिनिधींच्या मताधिक्यानें सुरतेस आपणास मिळाला आहे, असें कॉनव्हेनशनवाली मंडळी ह्मणतात. राष्ट्रीय सभेचे जे इतर भक्त आहेत, त्यांचें ह्मणणें असें कीं, कानव्हेनशनचे नियम आमचे मान्य करतां येत नाहींत, कारण राष्ट्रीय सभेचा अधिकार कॉनव्हेनशनला पूर्णपणें नाहीं, सुरतेस कानव्हेनशन मान्य न करणाऱ्या प्रतिनिधींचें मताधिक्य नसलें तथापि आमच्या बाजूस लोकांच्या बहुमताचें पाठबळ आहे. करितां कानव्हेनशनचे नियम राष्ट्रीय सभेचे नियम नव्हेत राष्ट्रांतील लोकांच्या मताधिक्यानें झालेले हे नियम नव्हेत सबब आह्माला त्या नियमांचें बंधन लागूं होऊं शकत नाहीं. पुनः राष्ट्रीय सभा भरवा. पूर्वी प्रमाणें पुनः सर्व व्यवस्था होऊं द्या. त्यांत जें ठरेल तें आह्मी मान्य करूं. या प्रमाणें उभयपक्षांच्या ह्मणण्याचा इत्यर्थ आहे. कलकत्त्याचे चार ठराव, राष्ट्रीय सभेचे उद्देश व नियम, अध्यक्षाची निवडणूक वगैरे गोष्टी तपशीलापैकीं आहेत. मुख्य मुद्दा कानव्हेनशन कमिटीनें ठरविलेले नियम व कांग्रेसची रचना ही लागू आहे कीं नाहीं एवढ्याबद्दलचा आहे. उभयपक्षांत या संबंधानें बाटाघाट चालू आहे. ज्यांनीं कानव्हेनशन मान्य केलें आहे त्यांची बाजू बाह्यतः अधिकारारूढ आहे आणि कानव्हेनशन मान्य न करणाऱ्यांची बाजू आपला हक्क शाबित करूं पाहणाऱ्या प्रमाणें दिसत आहे.

कानव्हेनशनच्या विरुद्ध बहुजनसमाज आहे ही गोष्ट नाकबूल करतां येत नाहीं. सुरतेच्या प्रकारापूर्वींही दोन पक्ष होते आणि त्यांतच कांहीं फेरबदल होऊन आतांचे पक्ष झालेले आहेत. प्रसंगानुरूप आणि विशिष्ट कारणावरून पूर्वींच्या पक्षांचें रूपांतर होऊन हल्लींचे पक्ष उत्पन्न झाले आहेत. तथापि उभय पक्षांतील आदिस्वरूप कायम आहे.

वास्तविकपहातां पूर्वींच्या पक्षभेदांतील द्वैताचें स्वरूप किंवा त्याचें स्थूल कारण बहुतेक अगम्य आहे. आपण अमुक पक्षाला कां मिळालो याचें स्पष्टीकरण फारच थोड्यांना करतां येईल. तथापि कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या आदरामुळें किंवा त्यांचे वरील विश्वासामुळें आपण अमुक एक पक्ष धरला असें पुष्कळांना सांगतां येईल. आणि हें सांगणें सर्वांच्याच बाबतींत वावगें होईल असें नाहीं. कोणतेंही सार्वजनिककार्य नेत्या पुरुषांवरील विश्वासाच्या जोरावर समाजाला पार पाडतां येतें ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. आज उपलब्ध असलेल्या व्यक्तींच्या हातीं राष्ट्रानें आपल्या भवितव्याचीं सूत्रें सोंपविलीं आहेत, तेव्हां त्या व्यक्तींवर

सर्वांचा सारखाच विश्वास राहावा हें इष्ट आहे. राष्ट्रीयसभेचें कार्य गेलीं बावीस वर्षें याच विश्वासाच्या आधारावर चालत आलें आणि यापुढें तें तशा आधाराशिवाय चालणें दुष्कर आहे. सुरतेस कानव्हेनशन मध्यें सामील झालेल्या गृहस्थांत राष्ट्रीय सभेचे परंपरागत भक्त पुष्कळ आहेत. त्यांनीं एकंदर विचार करून राष्ट्रीय सभेची भावी व्यवस्था तत्वरूपानें ठरविली आहे; या व्यवस्थेंत कोणाला कांहीं अडचणी येतील आणि त्या तपशिलाच्या स्वरूपाच्या असतील, तर त्या दूर होण्याला पूर्ण अवकाश आहे. परंतु अनपेक्षित रीतीनें राष्ट्रीय सभेंत घोर द्वैत माजल्यानंतर जीं कांहीं तत्वें त्यांनीं आखून दिलीं आहेत तीं मान्य करणें हें राष्ट्रीय सभेची परंपरा मान्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे. ही परंपरा ज्यांना मान्य नसेल किंवा अवगत नसेल, अथवा इष्टही वाटत नसेल त्यांचा राष्ट्राच्या कार्यांत कांहीं संबंध नाहीं असें कोणीही ह्मणूं शकणार नाहीं. परंतु राष्ट्रीय सभा ह्मणून जी संस्था गेलें पाव शतक चालत आली आहे, तिच्याविषयीं व तिच्या कार्याविषयीं आदर बाळगणाऱ्या प्रत्येकाला परमपूज्य दादाभाईंचा उपदेश शिरसावंद्यच झाला पाहिजे. ज्या व्यक्तिसमूहांच्या जेतृत्वावर आमच्या उभय पक्षांचा विश्वास आहे त्यांची परंपरा एकच आहे, हें ध्यानांत घेऊन दीर्घ काळपर्यंतच्या ऐक्यांत बिघाड उत्पन्न न होऊं देणें, हेंही सर्वांचें कर्तव्य आहे. विद्वानांचा वाद तत्वबोध करतो. अन्य स्वरूपांच्या व्यक्तींच्या भांडणांत लाथांचा सुकाळ होतो. राष्ट्राला नेहमींच तत्वबोधाची आवश्यकता असते. आतांच्या सारख्या वेळीं विद्वानांना वादांतून वितंडवादांत शिरूं लावणें हें घोर पातक होईल.

## स्वदेशीचा विजय.

नवरात्रांत कलकत्ता येथें दुर्गापूजे निमित्त मोठा उत्सव होत असतो. बंगाली लोकांमध्यें हाच सण मुख्य मानण्यांत येतो. व्यापारीही आपआपले व्यापारव्यवहार याच मुमुहूर्तावर चालूं करितात. या मुहूर्ताचे दिवशीं विलायती कापडाच्या चाळीसपन्नास हजार गांठींचे सवदे होत असत. यंदाचें वर्षी दहा हजारांपेक्षां ज्यास्त गांठींचे सवदे झाले नाहीत. ही एकच गोष्ट देखील बंगाली लोकांचे स्वदेशीव्रत किती कडकडित आहे याची साक्ष देईल. तीन वर्षांचे आंत एक चतुर्थांशावर विलायती कापडाची मागणी यावी ह्यापेक्षां बंगालकरांच्या निश्चयाच्या दृढतेचें प्रमाण आणखी कोणतें पाहिजे? तीन वर्षांपूर्वीची बंगाली मनुष्याची मूर्ति डोळ्यापुढें आणली तर ती नखशिखांत विलायती कपड्यांनीं सजलेली अशी असेल. पण आज प्रत्यक्ष कलकत्त्यास जाऊन पाहिलें तर निराळाच प्रकार दिसून येईल यांत शंका नाहीं. व्यापारी लोकांच्या व्यवहारावरून लोकांच्या प्रवृत्तीचा अंदाज जसा काढतां येतो तसा तो दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीवरून काढतां येणार नाहीं. नुसत्या व्याख्यानांवरून किंवा कोरड्या शपथांवरून प्रत्यक्ष स्थिति ताडण्याचें काम धोक्याचें होईल. पण आपलें सर्वस्व ज्यांनीं व्यापारांत गुंतवून ठेवलें आहे त्यांच्या व्यवहारांत असला ढपंडाव मुळींच चालावयाचा नाहीं. बाजारांत खप नसला, तर कितीही माल सांठवून ठेवला तरी तो त्या व्यापाऱ्यास नफा कधींही मिळवून देणार नाहीं. असा बुडित व्यापार करणारे कलकत्त्याचे व्यापारी असतील हें मुळींच संभवत नाहीं. कलकत्तेकरांनीं स्वदेशी संबंधानें हा जो विलक्षण परिभाव इतक्या थोड्या अवकाशांत दाखविला आहे, तो इतरांना आवेशजनक व्हावयास पाहिजे.

## सहानुभूती.

निजाम सरकारच्या राजधानीची अगदीं दाणादाण होऊन गेली आहे. सहस्रावधी मनुष्यांची हानी व कोट्यावधी वित्ताची हानी ऐवढी पूर्वीं कधींच झाली नव्हती. गेल्या पंधरा दिवसांत तें अफाट हैदराबाद शहर होतें कीं नव्हतें असें झालें आहे! अशा संकटाच्या समयीं निजाम सरकारासंबंधानें सर्वत्र सहानुभूती व्यक्त होत आहे आणि लोकसमूह द्रव्यद्वारा कांहीं मदत पाठवून ईश्वरापाशीं प्रार्थना करीत आहे हें अगदीं साहजिक होय. हैदराबाद दरबार ह्मणजे आमच्या देशांतील प्रमुख संस्थान आहे. चक्रवर्ती एडवर्ड बादशहा पासून सर्वच सर्व लोक निजाम सरकारास धैर्य देत आहेत. ही कळकळ पाहून निजाम सरकारास परम आल्हाद वाटतो आणि त्यांच्या मोठ्या निश्चयानें, उदारपणानें व कर्तबगारीनें अस्ताव्यस्त झालेल्या प्रजाजनांची स्थीरस्थावरता बरीच लवकर होत चालली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

सहानुभूतीचा विकास आमच्या प्रांतांत विशेष असल्यास नवल नाहीं. प्रत्यक्ष आकोल्यास गेल्या गुरुवारीं दोन जाहिरसभा भरल्या आणि वर्गणी गोळा करण्याचें काम जारीनें चालूं आहे. प्रत्येकाला वाटेल कीं निजाम सरकाराला मदत करण्याची आपली ती काय शक्ती! पण खरोखर यथाशक्ती प्रत्येकानें आपलें पत्रपुष्प अर्पण करावें ह्मणजे आपण व्यक्तिशः दुःखाचे वांटेकरी होतों आणि भूतदयेच्या गोष्टींमुळें तितक्या मानानें स्वतांस व आपल्या संसर्गीयांस आपण पुनीत करितों. अशा सत्कार्यांमध्यें जो कोणी आघाडी मारतो तो अधिक धन्य. या दृष्टीनें आह्मी येथील ‘अंजोमन मुफीदुल मुसूलेमीन’ ह्मणजे मुसलमानांची विद्याप्रसारक मंडळीचा विशेष गौरव करितों. तिनें प्रथम वर्गणीचें काम हातीं घेतलें आणि त्या संस्थेच्या निमंत्रणावरून गेल्या गुरुवारीं सकाळीं येथील टाऊन हालांत पहिली जाहिरसभा भरली होती. त्यासमयीं अध्यक्ष राजश्री क्रॉफर्ड डिपुटी कमिशनर हे होते. पुष्कळ लोक जमले आणि राजश्री क्रॉफर्ड यांनीं मोठ्या कळकळीचें भाषण केलें. त्यांनीं निजाम सरकाराबद्दल आदरभाव व्यक्त करून स्वतां १०० रुपये वर्गणीचा आंकडा टाकला; आणि या कामीं चांगली मदत देण्याचें आश्वासन दिलें. अध्यक्षांच्या मोठ्या आंकड्यानें इतरांस प्रोत्साहन मिळालें आणि सुमारें १ हजारापर्यंत सभेंतच वर्गणी जमली आणि वर्गणी गोळा करण्याचें कार्य एका व्यवस्थापक कमिटीकडे सोंपविण्यांत आलें. राजश्री क्राफर्ड साहेब यांनीं अशा लोककार्यांत इतका पुढाकार घेतला ही गोष्ट त्यास भूषणावह आहे इतकेंच नाहीं तर इतर जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांस त्यांनीं हा कित्ताच घालून दिला आहे.

अलिकडे पुष्कळशा कारणामुळें सरकारी बाजू व लोकांची बाजू असे दोन मोठे तट पडले आहेत. या दुसऱ्या बाजूला पक्षभेदामुळें वाटतें कीं आह्मी सरकारी मदती शिवाय जें कांहीं करावयाचें तें करूं, तेथें आह्माला डिपुटी कमिशनर अध्यक्ष नको, आणि लोकांची वर्गणी सरकारी अंगाशिवाय जेवढी जमेल तेवढी ती अधिक श्रेयस्कर होईल. अर्थात् गेल्या गुरुवारी सायंकाळीं येथील कांहीं हिंदु सभ्य गृहस्थांच्या निमंत्रणावरून काळ्या मारोतीच्या पटांगणांत दुसरी एक नंगी जाहिरसभा भरली होती तेव्हां तेथेंहि या धर्मकार्यासंबंधानें लोकांचा विशेष उत्साह दिसला आणि वर्गणी गोळा करण्याचें काम जारीनें सुरू आहे. धर्मादायाच्या बाबतींत ही ईर्षा व स्पर्धा पाहून विशेष आनंद वाटतो. आणि निजाम सरकारांच्या संबंधानें इतका कळवळा जागृत आहे ही विशेष समाधानाची गोष्ट होय.

## बेंच म्याजिस्ट्रेट

आकोल्यास एक ऑनररी म्याजिस्ट्रेटांचें बेंच स्थापित करण्याचें घाटत आहे. आणि त्यामुळें ही सरकारी कृपा आपल्याला मिळावी ह्मणून पुष्कळसे मुत्सद्दी लोक आपापले वशिले बांधीत आहेत. हल्लीं जी नांवें लोकांच्या पुढें आलीं आहेत त्यांची ओळख नामनिर्देशानें केली ह्मणजे यावी बेंचाच्या योग्यतेविषयीं व कार्यकरित्वाविषयीं विशेष कथन नको आहे.

रा. रा. उमर हाजी करीम कच्छी
जमानखा सीलीमखा
ओंकार रामप्रसाद
वासुदेव देवराव दिगंबर

हीं नांवें पक्कीं खात्रीचीं ह्मणून लोकांच्या तोंडून ऐकूं येतें आणि याशिवाय रा. रा. बळवंत नरसिंह मुधोळकर, रा. रा. रहिमानबेग मिरझाबेग आणि हफीजुद्दीन जाहगीरदार हाजली (कुरणखेड) यांचींही नांवें विकल्पें आलीं आहेत. आनररी म्याजिस्ट्रेटीचा सन्मान ज्यांस पाहिजे आहे आणि ज्यांचा त्या दिशेनें लोककार्य करण्याचा इरादा आहे त्यांनीं या प्रसंगीं आपण होऊन पुढें होण्यास कसर करूं नये कां कीं अशी पर्वणी वारंवार येत नसते.

## प्रदर्शन

मध्यप्रांत व वऱ्हाड या दोन्ही प्रांताचें मिळून नागपुरास भरणारें प्रदर्शन पूर्व संकेताप्रमाणें ता० १२ नोवेंबर रोजीं उघडण्यांत येईल. या प्रदर्शनाच्या समारंभा करितां कडेकोट तयारी चालूं आहे आणि हा सर्व कार्यारंभ फार उत्कृष्ट व अप्रतिम होईल असा रंग दिसतो. उपयोगाच्या दृष्टीनें प्रदर्शनांत नानाविध प्रकारचें शिक्षण मिळेल तें निराळें पण त्या शिवाय करमणुकीच्या गोष्टी पुष्कळशा घातल्या आहेत. सरकारी आश्रय मुख्य असल्यामुळें लोकांची मदतही दांडगी मिळाली आहे. प्रदर्शनाचा पहिला प्रवेश समारंभ गुरुवार ता० १२ नोवेंबर रोजींच होईल आणि ही तारीख बदलण्यांत येणार आहे असें मुंबईकडे व इतरत्र वर्तमान पसरलें आहे तें निराधार असून चुकीचें आहे असें सुप्रसिद्ध करण्यासाठीं या प्रदर्शनाचे मुख्य अधिकारी राजश्री लो साहेब यांनीं मुद्दाम लिहिलें आहे. तारीख १२ नोवेंबर ही निश्चित असून ती पक्की ठरलेली आहे. या समारंभा निमित्त रेल्वेनें आपले भाड्याचे दर निम्मे केले आहेत. नागपुरास लोकांच्या उतरण्याच्या सोयी पुष्कळशा आगाऊच करून ठेविलेल्या आहेत. सर्व पूर्व लक्षणें असें सांगतात कीं हे प्रदर्शन चिरस्मरणीय असें होऊन प्रांतिक सरकाराच्या वैभवाला शोभेल असें टोलेजंग होणार आहे. या प्रदर्शनाचा लाभ सार्वजनिक व्हावा ह्मणून सर्व बाजूंनीं इरप्रयत्न चालूं आहेत. ईश्वर करो आणि सरकारच्या व लोकांच्या भगीरथ प्रयत्नांला सुयश येवो!

## विजयादशमी

हा मोठा सण आकोल्यास मोठ्या आनंदाचा गेला. त्या दिवशीं यंदा मोठा लोकसमूह नदी कांठच्या मैदानावर जमला होता. रा० माधवराव मराठे यांनीं मोठ्या कळकळीनें सीमोल्लंघनाची महती वर्णिली आणि लोकांनीं या मुमुहूर्तावर शपथा घेऊन स्वदेशीचा अंगीकार केला.

# वऱ्हाडवृत्त.

हवामानः— ऋतुमान पालटलें असून थंडी चांगली पडूं लागली आहे. पिकें चांगल्या स्थितींत आहेत. खामगांवचा प्लेग मंदावला असून उमरावतीचें मान तसेंच कमी होईल असा रंग दिसतो. या दोन्ही शहरांच्या आसपास या रोगाचा फैलाव होत चालला आहे. हवामान चांगलें आरोग्यवर्धक होऊन ईश्वरकृपेनें सर्वत्र अरिष्ट टळो!

काल सायंकाळीं नागपूरच्या प्रदर्शनाला पाठवावयाच्या वस्तूंची निवडा निवड करण्या संबंधानें सभा भरली होती.

आज बारावाजल्या पासून राजश्री ज्यांडो साहेब यांच्या हातून वऱ्हाड शाळाखात्याच्या विद्या परिषदाला प्रारंभ होऊन सर्व आठवडाभर पुष्कळशा व्याख्यानांचा, विद्याविषयक भवति न भवतींचा निरनिराळ्या खेळामध्यें विद्यार्थ्यांच्या सामन्यांचा लाभ आकोलेकरांस होणार आहे.

अखिशान नामदार चीफ कमिशनर राजश्री क्रॉफर्ड यांची स्वारी चिखलदऱ्यास विश्रांती घेत आहे तेथून स्वारी परत उमरावतीला येत्या गुरुवारीं येऊन चार दिवस उमरावतीस मुक्काम होणार आहे.

दरबार—उमरावतीस ता. १९ रोजीं दरबार भरून नवीन किताब मिळालेल्या तीन सद्गृहस्थांस सनदा अर्पण करण्यांत येऊन राजश्री क्रॉडाक हे मुद्दाम संचालनही करणार आहेत. गांवोगांवच्या शिष्ट जनांस निमंत्रणें आलेलीं आहेत.

दोन घडयाळे एकदम बोलाविणारास पोस्ट खर्च माफ.

मनकर्णाच्या २४ शिइया बोलविणाऱ्यास रा. सिल्वर ६ आळ नक्षीस साखळी सुद्धां शिशीस ।.



रासकोप सिस्टम कि. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच कि. रु. ९। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीळीचे खिशातील घडयाळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ९। स्वदेशी सेकंड वाली रु ६ पोस्टखर्च ।-

कं. नुरा आणि कं.

नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्या वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून बक्षशिरीकाम केलें जाईल आजवर ९०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. व हेर गांवच्या लोकांकडून रेलेभाडें व जे वग खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

लेखक.

सायकल टीचर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इ. ७ आकोला ( शहर )

नाशि तयार परोवर्त

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आम्ही येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अदतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त मुबक व बक्षशिर पाठवीला जाईल. आम्हांस शेंकडो पत्र आलीं आहेत.

पत्ता:—

श्रीनिवास बाळकृष्ण होडे जनरल मर्चंट व कामशन एजंट.

नं ७२ येवले.

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस—

सा. न. वि. वि. तुम्ही कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्याने कडबा फार चांगला कापला जातो. सदरहू यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही

जहागीरदार सीप रायी | श्रीमंत नानासाहेब
( ग्वालेर ) | फाळके दफ्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या कायद्याप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००।

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरेंडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकुमावरून

पी. सी. जोगळेकर
आणि कंपनी
म्या. एजंटस्

नं. २२

## दवाखाना.

आमचे दवाखान्यांत सर्व तऱ्हेच्या वनौषधी, मात्रा, गुटिका, चूर्ण वगैरे विक्रीस तयार आहेत. बाळांतरोग, गर्मी परमा, मुळव्याध, कवळ, पानथरी, हरतऱ्हेचे हिवताप इ. रोग कळविल्यास परिक्षा करून अनुभवीक औषधें माफकदरानें पाठवूं. घरी बोलविल्यास वेगळी फी घेतली जाईल. गर्भकर्ण मलम ॥= बाटली ८६.

शिवचरणगीर रामगीर वैद्य,
कुरणखेडकर
दवाखाना शहर आकोला

यात्रा वर्षापासून परीक्षित व सरकारी कडून रजिस्टर केलेला.

## सुधासिन्धु

कालरा, ( पटकी ) दमा, खोकला, कफ, पोटशूल, अतिसार, संग्रहणी, जुलाब, अतिनिद्रा, वातजन्यरोग, व मुलांचे रोग या सर्वांवर एकच स्वादिष्ट व रामबाण औषध. प्रत्येक शिशीचीं किंमत ॥. एका डझनास रुपये ५ टपाल हांशील १ पासून ४ पर्यंत ।≈ आणे व डझनास ।. आणे. एकदम ६ घेणारास १ फुकट पूर्ण माहिती व सरटीफिकीट पाहण्याकरितां क्याटलाग फुकट पाठवूं प्रत्येक ठिकाणीं एजंट पाहिजेत. नियम मागाहून पहा.

मिळण्याचा पत्ता

सुख संचारक कंपनी
मथुरा

नं. व. ९१

## नोटीस

नोटीस बेशमी— बनाबाई नवजे मयत रंगोबा सोनार राहणार उज्जन ईसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची मुलगी माझी लग्नाची बायको असून ती सज्ञान होण्यास बरेच दिवस झाले. आमचे वडील तेथें नेण्यास आले असतां न पाठवितां उलट तुमचे दीर नामे नारायणराव व बळवंतराव हे त्यांचे आंगावर मारण्यास आले व तोंडी शिवीगाळ करून खून करीन असा पुष्कळ धमक्या दिल्या. आतां आमची बायको जशा डागडागिन्यासुद्धां नेली होती तशीच नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत आणून घालावी. असें न केल्यास माझ संततीची हानी केल्याबद्दल व तिला गैर वर्तन लागल्यास ही जोखीम तुमच्यावर आहे. पुढें रितीप्रमाणें आम्ही तजवीज करूं. त्याचा येण्या जाण्याचा खर्च व कोर्ट खर्च व नोटीशीचा खर्च तुम्हांस द्यावा लागेल. कळावें. तारीख २६ माहे सप्टेंबर सन १९०८ इसवी-

सही

रामाराम गोविंद बेंगरे राहणार कारंजा काह द. खु.

नं. घ. ९४

## नोटीस

रा. रा. यशवंत सखाराम पिंपरकार राहणार कसबे डोणगांव तालुके मेहेकर जिल्हा बुलडाणें.

यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं रावजी वल्द रामजी टाले राहणार आरेगांव तालुके मेहेकर जिल्हा बुलडाणें, यांजवर आम्ही जमीन ताब्यांत मागण्याबद्दल दिवाणी मु. नंबर ६६१ १९०६ सनचा दावा केला होता त्यावेळीं तुम्ही आम्हांस सांगितलें कीं, माझी व बळीराम पाटील यांची साक्ष द्या म्हणजे तुमचा वरील मुकदम्यांत साडेसहा शेंनें नऊ वर्षे कर्जाच्या फेडींत बहातीस दिलें आहेत अशी आम्ही साक्ष देऊन लिहून देऊं. वरून मी तुमच्या भरंवशावर साक्षी दिल्या. पुढें तुम्ही साक्षीची टाळाटाळी करून मजला अडवून सांगितलें कीं. आमचे उभयतांचे साक्षीवर जर तुमचें काम झाल्यावर पाच्छल तुम्ही आम्हास काय द्याल. त्यावेळीं माझे जवळ गरीबीमुळें देण्याप काहीं नसल्यामुळें मी तुम्हास पाऊणेपांचशें रुपयांची प्रॉमेसरी नोट आपसांत ठराव होऊन लिहून दिली. ते ठराव असा कीं—साडेसहा नेवर जर आमचे साक्षानें मिळाले तर तुम्ही आम्हांस पऊणे पांचशें रुपये द्यावे न मिळाले तर ही तुमची प्रॉमेसरी नोट मी परत देईन असा करार मदार होऊन लिहून दिली. या नेटीशिवाय तुमचे व आमचें कोणतेंच प्रकारची देव घेव नाहीं. पुढें या मुकदम्यांत तुमचे साक्षीचें काम न पडतां त्याचा निकाल पंचावर नेमून त्याचा निकाल आपसांत झाला व ज्या साक्षीकरितां मी तुम्हांस नोट करून दिली तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं व माझी मिनगीही मला पूर्ण मिळाली नाहीं सबब आपसांतील करार रद्द झाला म्हणून तुम्हास मी लिहून दिलेली प्रमेसरी नोट परत मागितली. देण्याचें कबूल केलें परंतु ती दिली नाहीं व पुढेंही तिन चार वेळां मागितली असतां आजपर्यंत दिली नाहीं यावरून तुमचे मनांत माझे विषयीं बेमानी करणें दिसतें सबब या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यादिवसापासून आठ दिवसांचे आंत मजपासून पोकळ लिहून घेतलेली प्रामेसरी नोट परत करावी तसें न केल्यास ती बद्दल दावा वगैरे केल्यास व त्याबद्दल या नोटिशीवरून मी जबाबदार राहणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली ता. २१ माहे सप्टेंबर सन १९०८ इ.

सही

रामगीर गुरु बाळगीर
गोसावी संस्थान डोणगांव ता. मेहकर

नं. घ. ९५ जि. बुलढाणे

## वर्तमानसार

नाशिक येथे हिंदुमुसलमानांत मारामारी झाली, अशा अफवा रविवारीं मुंबई पसरल्या होत्या, परंतु त्यांत कांहीं तथ्य नाहीं. दसऱ्याच्या दिवशीं मिरवणुकीसंबंधानें कांहीं गडबड होऊं नये म्हणून देवळालीहून रॉयल स्कॉट्सची एक पलटण नाशिकला नेण्यांत आली होती. तेवढ्यावरून हा व्यूह रचला गेला असावा असा अनुमान आहे. 'टिळककी जय' 'खुदीरामकी जय' म्हणून ओरडण्याबद्दल गेल्या बुधवारीं नाशिक येथें कांहीं लोकांना पकडण्यांत आलें होते. त्यापैकीं कांहींस थोड्याशा दंडावर सोडण्यांत आले असून बाकीच्यावरील खटल्याचा निकाल व्हावयाचा आहे. नेहमीप्रमाणें दसऱ्याच्या दिवशीं मिरवणूक काढण्यास कांहीं हरकत नाहीं; परंतु 'खुदीरामकी जय' वगैरे आरोळ्या ठोकण्यास मनाई आहे असें अधिकाऱ्यांनीं लोकांस कळविलें. प्रसंग जाणून पुढाऱ्यांनीं मिरवणूक काढण्याचेंच तहकूब केलें.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मामी ऊ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक काति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें. ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसात एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. मर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह मुनाट परमा, मुष्ठीमैथुनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरिर निरोगी मजबुत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जवाम प लागते त्यांन उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खर्चा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्त्यावर मिळतील.

दर:—एकदम १९ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६९ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ९९० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजन:—पानें पडल, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, व इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:—कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडिक मुत्राची आग, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ १॥ भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक चूर्ण:—दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे .

५ विंचूचें विष:—औषध लावतांच उतरतें मुळीं २ तो. ८ आणे

६ गजकर्ण:—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:—औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:—आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, घात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे स. सो.

२ सामानाचा मोठा क्याटलाग मागव तो फुकट पाठवूं आपधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म काढ. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्चा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरु असून प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी असल्यामुळें एका जा धंदा सुरूं केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावं आमचे जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो पूर्णपर्यंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास थोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कोल्हापची ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रितीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशाहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचीच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळन इटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---

# ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established 1874.*

*HEAD OFFICE*—**BOMBAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if I miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay nd terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hrough decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, ofessional men, Tradesmen and other* mploying a portion of their annual income or profits in ... for once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may leave money yet if he di ssearly, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes bupqismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of t he step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a mouth or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained n application to—

M. De SOUZA.
CHIEF AEGNT
Nagpur.

No. 2

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १९ माहे अक्टोंबर सन १९०८ इसवी [ अंक ४०



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः—– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर सालदर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } आकोला ९।२।०९ } G. A Phillips एजंट
नं ७३

---

## बंगला विकाऊ

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर डिस्ट्रिक्ट जज्ज चांदा, मध्यप्रांत यांचा आकोला येथील बंगला विकावयाचा आहे. जनरल पोस्ट आफिसा समोरील विस्तीर्ण मैदानावर उभा आहे. ग्राहकांनीं विशेष विचारपूस खालीं सही करणाऱ्याकडे करावी. ता० १८-९-०८ इ०

नारायण खंडेराव फडके
नं. घ. ३९ वऱ्हाडसमाचार आकोला.

---

सत्रा वर्षांपासून परोक्षित व सरकारा कडून रजिस्टर केलेला.

## सुधासिन्धु

कालरा, ( पटकी ) दमा, खोकला, कफ पोटशूल, अतिसार, संग्रहणी, जुलाब, अतिनिद्रा, वातज्वरोग, व मुलांचे रोग या सर्वांवर एकच स्वादिष्ट व रामबाण औषध. प्रत्येक शीशीची किमत .॥. एका डझनास रुपये ५ टपाल हांशील १ पासून ४ पर्यंत ८= आणे व डझनास .।. आणे. एकदम ६ घेणारास १ फुकट पूर्ण माहिती व सरटीफिकीट पाहण्याकरितां क्याटलाग फुकट पाठवूं प्रत्येक ठिकाणीं एजंट पाहिजेत. नियम मागाहून पहा.

मिळण्याचा पत्ता
सुख संचारक कंपनी
मथुरा

नं. घ. ५३


---

## वर्तमानसार.

रा. केळकर यांनीं बॅरिस्टर मि. बहादूरजी यांच्यामार्फत हायकोर्टापुढें ता. १२ रोजीं सपशेल माफी गुजरली, रा. केळकर यांचा ता. ६ रोजीं केलेला प्रतिज्ञालेख वाचण्यांत आला. त्यांत प्रथम बेअदबीच्या खटल्याची पहिल्या निकालापर्यंतची हकीकत दिली असून दंड भरलेला आहे असें त्यांत ह्मटलेलें होतें. शेवटीं 'कोर्टाचा हुकूम मला वंद्य आहे व मी या लेखानें झालेल्या बेअदबीबद्दल सपशेल माफी मागतों असें' प्रतिज्ञालेखांत ह्मटलें आहे.

मॅट्रिक्युलेशन परीक्षा युनिव्हर्सिटीस बंद करून ज्या त्या कॉलेजनें आपआपली एंट्रन्स अथवा प्रवेश परीक्षा घ्यावी अशी एक सूचना झाली आहे. नवीन होणारी सॅमून प्रयोगशाळा हें नवीन टीचिंग युनिव्हर्सिटीचें बीजारोपण आहे. असा समज आहे.

उर्दू इमोलाचे संपादक मि. फाजल हसन यांस राजद्रोही लेख लिहिण्याबद्दल अलीगडच्या मॅजिस्ट्रेटनीं २ वर्षें सक्तमजुरी व ५०० रुपये दंड अशी शिक्षा फर्मावली होती. त्यावर हायकोर्टांत अपील झालें होतें. ज. ग्रिफन यांनीं शिक्षेची मुदत एक वर्षानें कमी केली.

इंदूर संस्थानचे माजी अधिपती श्रीमंत शिवाजीराव महाराज होळकर यांस बडवाई मुक्कामीं ता० १३ दोनप्रहरीं देवाज्ञा झाली. संध्याकाळीं ८॥ वाजतां स्पेशल ट्रेन महाराजांचें प्रेत घेऊन इंदूर स्टेशनावर येऊन दाखल झाली. सुमारें एक तासानंतर, स्टेशन वरून स्मशानयात्रा निघाली. संस्थानांतील सर्व अंमलदार, युरोपियन अधिकारी व लष्करी लोक ह्या प्रसंगीं हजर होते. कचेऱ्या दुकानें व विद्यालयें बंद ठेवण्यांत आलीं आहेत.

युरोपियन राष्ट्रांची परिषद भरणार आहे त्या परिषदेपुढें आपल्या स्वातंत्र्याचा प्रश्न विचाराकरितां ठेवण्यास बल्गेरिया तयार नाहीं. आपल्या स्वातंत्र्याचे आपणच वाली आहों व ह्या बाबतींत दुसऱ्या कोणावर अवलंबून राहावयाचें नाहीं, असा बल्गेरियाचा दृढनिश्चय झाला आहे. तुर्कस्ताननें आपलें स्वातंत्र्य कबूल केलें पाहिजे अशी बल्गेरिया मागणी करणार आहे व तीन दिवसांत उत्तर आलें नाहीं तर आपण युद्धाचा पुकारा करूं, असा तुर्कस्थानाकडे खलिता पाठवून देणार आहे, असें पारिसच्या 'मेरिन' पत्राचा सोफिया येथील बातमीदार कळवितो.

ब्रिटिश, फ्रेंच व रशियन प्रधानांचें अनुकरण करून फ्रेंच व रशियन वकिलांनींही तुर्कस्तानास आश्वासन दिलें आहे कीं बर्लिनच्या तहावरील सहीदारांच्या मंजुरीखेरीज सदर्हू तहांत आपण फेरबदल होऊं देणार नाहीं. ह्या बाबतींत आस्ट्रिया मात्र अलग राहिलें आहे.

मिदनापूर येथें पुष्कळ दिवस अटकेंत असलेल्या अखिलबाबू नांवाचा एका कैद्यानें 'पत्रिकें'त तुरुंगवास कसा असतो ह्यासंबंधाचें मनोवेधक वर्णन प्रसिद्ध केलें आहे. कैद्याच्या अनेकविध वैभवापैकीं मुख्य वैभवाची गोष्ट ही कीं, त्याचा परसाकडेचा व पाणी पिण्याची लोटा एकच असतो. वगैरे प्रकारची माहिती अखिल बाबूंनीं दिली आहे.

विश्ववृत्तावरील खटला— प्रो० विजापूरकर वगैरे मंडळींना डि. मा. चे कोर्टांत बोलाविलें होतें. पो. प्रासिक्यूटर यांनीं मुदत मागितल्यावरून खटला १९ तारखे पर्यंत तहकूब ठेवण्यांत आला आहे. प्रो० विजापूरकर वगैरेंना करवीर शहर सोडून जाऊं नये असें कळविल्याचें समजतें.

'इंग्लिशमन' व 'एंपायर' ह्या वर्तमानपत्राच्या संपादकीय शाखेवर पूर्वी काम केलेलें मि. ए. गुडेन हे सांप्रत विलायतेंत आहेत. विलायतेंतील 'डेली एक्सप्रेस' पत्रांत एक लेख लिहून त्यांनीं आपल्या शहाणपणाचे तारे तोडले आहेत. गुडेनसाहेब ह्मणतात:—"कलकत्त्यांतील बार लायब्ररीचे कांहीं सभासद हिंदुस्थानांतील अस्वस्थता कायम ठेवीत आहेत व ह्या कामीं त्यांना कलकत्त्यांतील तीन आंग्लो-इंडियन पत्रकार मदत करीत आहेत. ह्या अस्वस्थतेशीं बंगालच्या विभागणीचा कांहीं संबंध नाहीं."

लझारस उपनांवाच्या युरोपियन बंधूंना मारहाण केल्याबद्दल शिक्षा झालेले वयोवृद्ध बंगाली वकील दुर्गाचरण सन्यल हे तुरुंगवासांच्या हालअपेष्टांमुळें वेड झाले आहेत व त्यांना वेड्यांच्या इस्पितळांत नेले आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली होती. ही बातमी निराधार आहे, असें 'इंग्लिशमन' पत्र ह्मणतें. दुर्गाचरण हे पूर्व बंगाल्यांतील गृहस्थ आहेत व ह्मणून त्यांना डाकाच्या सेंट्रल जेलमध्यें नेण्यांत आलें आहे.

मद्रासच्या 'इंडिया' नामक तामिल पत्राचे संपादक मि. श्रीनिवास अय्यंगार यांच्यावरील राजद्रोहाचा खटला सेशन कमिट करण्यांत आला आहे. मला काय सांगावयाचें तें सेशन्समध्येंच सांगेन, असें मि० अय्यंगार हे कोर्टास उत्तर देतांना ह्मणाले.

निवारण मन्मथनाथ नांवाच्या दोघां सन्मान्य बंगाली गृहस्थाचे बासिनघाट येथें हामरस्त्यावर खून झाल्याची बातमी आहे. सदरहू बंगाली गृहस्थ स्वदेशी चळवळीचे भक्त ह्मणून प्रसिद्ध होते.

सर्वियाचें पार्लमेंट भरलें असतां बाहेर लोकांची अतोनात गर्दी झाली होती व ऑस्ट्रियाशीं युद्ध झाले पाहिजे, असें लोकांचे जयघोष होत होते. ह्या बाबतींत सर्वियाच्या सामर्थ्यापेक्षां त्यांची आतुरताच जास्त दिसून येत आहे; कारण, सर्विया हें चिमुकलें संस्थान असून ऑस्ट्रियाशीं दोन हात करून जय संपादन करण्यास तें असमर्थच आहे. सर्वराष्ट्रीय युद्धाचा वणवा पेटला तरच ऑस्ट्रियाशीं युद्ध सुरू केल्यानें सर्वियाला कदाचित् फायदा होण्याचा संभव आहे. ऑस्ट्रियानें बॉस्निया व हर्झगोविना हे प्रांत जोडल्यामुळें व बल्गेरियानें आपलें स्वातंत्र्य पुकारल्यामुळें तुर्कस्तानांतील लोकमत खवळून गेलें आहे; परंतु, तुर्कस्तानचे हितसंबंध व तुर्कस्तानची राष्ट्रीय इभ्रत सलामत आहेत तोंपर्यंत तुर्कस्तान आपल्या तरवारीस हात घालणार नाहीं, असें लंडनमधील तुर्की वकिलांनीं एका मुलाखतीचे वेळीं सांगितलें.

गाडी चालू असतां एका डब्यांतून दुसऱ्या डब्यांत जाण्यास उपयोगी पडणारे फुटबोर्ड व लोखंडी गज काढून टाकण्यासंबंधानें रेल्वेबोर्डानें केलेली सूचना अमलांत आणण्याची ता. १२ पासून तजवीज होणार आहे. पंजाब मेल येथें येऊन पोहचतांच सबंद गाडीच किकीया येथील वर्कशॉपमध्यें नेण्यात येईल. तिचें फुटबोर्ड व लोखंडी गज काढून टाकण्यास तिनचार दिवस लागतील. त्याचप्रमाणें मुंबईमेल, एक्सप्रेस व पॅसेंजर गाड्या क्रमाक्रमानें दुरुस्तीसाठीं वर्कशॉपमध्यें नेण्यांत येतील. दुरुस्तीचें काम निदान दोन महिनें तरी चालेल.

वऱ्हाडसमाचार

आश्विन वद्य १० शके १८३०

## विद्यार्थ्यांच्या तेजोवधाची तयारी.

'सर्वांत मुंबईच पुढें कां' याचें विवेचन आमचे एक सन्माननीय बंधु सध्यां करीत आहेत; त्यांचा निर्णय कांहींही होवो, मुंबईचें सरकार सर्वांच्या पुढें जात आहे हें मात्र अगदीं खरें आहे. स्वदेशी चळवळीच्या सुरवातीनंतर सर्व प्रांतिक अधिकाऱ्यांची विद्यार्थी वर्गावर करडी नजर राहूं लागली. पण आजपर्यंत रिस्ले सक्युलरची कॉपी सर्क्युलेट करण्यापलीकडे कांहीं न करूं इच्छिणाऱ्या अधिकाऱ्यांनीं अंगांत कांहीं संचार झाल्याप्रमाणें एकदम एक जाहिरनामा काढून विद्यार्थ्यांचीं मुस्कुटें व हातपाय बखडून टाकण्याचा प्रयत्न करावा हें बरेंच आश्चर्यजनक आहे. गेल्या जुलै महिन्यापासून मुंबई सरकारच्या अंतर्वेदींतील वातावरण बिघडलें असल्यामुळें कसकसे प्रकार बहून आले याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. सध्यांचा सरकारचा ठराव त्याच मालिकेंतील एक मणि आहे. मुंबई सरकारनें हा अव्यापारेषु व्यापार केलेला आहे, तसें करतांना सरकारच्या सत्तेचा फाजील धाक घालण्यांत आला आहे, शिस्ती संबंधाच्या आमच्या पूर्वकालीन कल्पनांची ओढाताण करून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा प्रयत्न झालेला आहे असें मुंबई कडचें व इतर ठिकाणचें लोकमत आहे. आजपर्यंतच्या मुंबई सरकारच्या ठरावांत बहुधा न दिसणारी हेकेखोरपणाची व हिरवटपणाची पूर्ण छाया सध्यांच्या ठरावांत दिसत आहे. मुलांना शिस्त नाहीं हें ह्मणणें मुळांतच आह्माला कबूल नाहीं. शाळांतील वागणुकीसंबंधानें सरकारी हास्कुलांत जे नियम गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या वहिवाटीनें पडलेले आहेत व जे विद्याखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं टाकाऊ ह्मणून आजपर्यंत ठरविलेले नव्हते, त्याच नियमाप्रमाणें मदत घेणाऱ्या शाळांतीलहि शिस्त राखण्यांत येत असे. उलट पंधरावीस वर्षांपूर्वीं विद्यार्थ्यांच्या अंगीं दिसून येणारा आडदांडपणा सध्यांच्या पिढींतून अगदीं नाहींसा झाला आहे. आतांचा ठराव निघण्यापूर्वींच एवढा परिणाम झालेला असतां या नव्या उपायांची जरूर काय होती? असा प्रश्न साधारण समजुतीचा मनुष्य करील. पण त्याला उत्तर एवढेंच आहे कीं राष्ट्रांत उत्पन्न झालेल्या नूतन चैतन्यामुळें उपासमारीनें रोडवलेल्या मुलांच्या अंगांत सुद्धां एक प्रकारचें-अव्यवस्थित का होईना-पाणी खेळूं लागलें आहे. हें पाणी नाहींसें करण्यापेक्षां मुंबई सरकारच्या ठरावांत दुसरा कांहीं हेतु दिसत नाहीं. आतांची विद्यार्थी दशेंत असलेली पिढी शारिरीक शक्तीनें कमी असली तरी नैतिक तत्वानें आधिवेष्टित आहे. शारिरिक शक्ती हातची गोष्ट आहे. मनांत आणल्यानंतर हट्टप्रयत्नानें ती साध्य होणारी आहे. पण बौद्धिक किंवा कल्पनात्मक तेजाची गोष्ट तशी नाहीं. तें सर्वांना सर्व काळीं सारखें साध्य नसतें. राष्ट्रीयत्वाचें ज्ञान आबालवृद्धांना प्राप्त झाल्यानंतर त्यांचा सर्व व्यवहार त्याच एका कल्पनेच्या धोरणानें चालत रहाणार. पडत्या काळांत राष्ट्रांना असें केल्याशिवाय गत्यंतर नसतें असें ह्मटलें तरी फारसें चुकणार नाहीं. सध्यांची विद्यार्थ्यांची वागणूक याच कल्पनेच्या धोरणानें चालूं असते ही गोष्ट कोणीही नाकबूल करीत नाहीं, आणि तशा रीतीनें वागतांना त्यांचेकडून विशेष शिस्तीची किंवा फाजील नियमितपणाची अपेक्षा कां करावी हें आह्मांस समजत नाहीं. विद्यार्थ्यांनीं सदासर्वकाळ सोंवळें, शुचिर्भूत रहावें हें ह्मणणें निराळें आणि त्यांनीं शहरांत घरीं राहून वडील माणसांत उघडपणें प्रत्येहीं चालत असलेल्या गोष्टी कानावर सुद्धां पडूं देतां कामा नये, असें ह्मणणें निराळें. मुलांनीं कोणत्याहि वादात्मक सार्वजनिक बाबतींत मन घालूं नये हें ह्मणणें तत्वतः सर्वच लोक कबूल करतात व जो तो आपआपल्यापरीनें तशी खबरदारी घेतोहि. पण कित्येक प्रसंग असे असतात कीं त्यांच्या नुसत्या अवलोकनानें जो सुपरिणाम होतो त्याच्यापुढें आगंतुक किंवा काल्पनिक दुष्परिणामांची मतवरी कांहींच उरत नाहीं. अशा कांहीं विशेष प्रसंगांमुळें पूज्य असणाऱ्या व्यक्तीविषयीं विद्यार्थ्यांच्या मनांत अपूज्यबुद्धि किंवा तिरस्कार उत्पन्न झालाच पाहिजे, त्यांनीं शिस्त मोडून अद्वातद्वा वर्तन केलेंच पाहिजे तसें त्यांच्या हातून न होणें शक्य नाहीं, असें ह्मणण्याला काय आधार आहे? विद्या देणारे गुरु मातापितरांप्रमाणेंच पूज्य आहेत, गुरुंनीं जरी व्यावहारिक ज्ञान दिलें तथापि त्या बरोबर सदाचरणाचा उपदेश त्यांचेकडून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें नेहमीं होत असतो तोहि विद्यार्थ्यांना प्राह्य आहे या गोष्टी सध्यांच्या काळीं अनुभवास येत नाहींत असा मुंबई सरकारचा समज झालेला दिसतो. तसा समज होण्याला तशींच विशेष कारणेंहि असतील. पण अध्यापकाचा व्यवसाय करणाऱ्यांचा अनुभव मुंबई सरकारपासून निराळा आहे व त्यांची या संबंधांतील कल्पनाहि भिन्न आहे. शाळांतून जें अक्षरशिक्षण द्यावयाचें त्यांच्याबरोबर मुलाचें शील तयार करण्याची खबरदारी शिक्षक नकळत घेतात. आह्मा आर्यांच्या शिक्षणपद्धतीच्या तेजस्वी परंपरेंतील हा एक उज्वल भाग आहे. आपण गुरु ह्मणून कोणाही आर्य शिक्षकांस बळेंच सोंग आणावें लागत नाहीं किंवा विद्यार्थ्यांनाही गुरुविषयींचें कर्तव्य एखाद्या ठराविक पुस्तकांतून किंवा सरकारी ठरावांतून पाठ करावें लागत नाहीं. तें त्यांच्या अंगीं उपजतच असतें. हा परंपरेचा प्रभाव आहे. पण त्या बरोबर दुसरीहि अशी परंपरा गेल्या शंभर वर्षांत उत्पन्न झाली आहे कीं शाळेंत मुलगा असतो, मुलावर गुरुची देखरेख असते, तो घरीं गेला ह्मणजे गुरुच्या शिक्षणाच्या परिणामान्वयें तो आपले सर्व व्यवहार करतो पण त्यांची जुळणी मात्र घरीं मातापितरांकडून अगर वडील माणसांकडून होते. मुंबई सरकारानें पेनाच्या एका फटकाऱ्यानें शेंपाऊणशें वर्षांची ही पद्धत त्याज्य ठरवून घरीं देखील विद्यार्थ्यांवर घरच्या माणसांची हुकमत चालूं नये त्या ठिकाणीं शाळेंतील मास्तरांची ह्मणजे सरकारचीच हुकमत चालली पाहिजे असा नियम केला आहे. मुलांवरचें पालकाचें वजन या प्रकारें हिरावून घेतल्यानें सरकाराच्या इभ्रतींत किंवा शक्तींत कांहीं भर पडत असली तर सरकारचें करणें त्यांच्या दृष्टीनें इष्ट आहे. पण मुलांवर सावत्र बापपणा चालवूं जाणें श्लाघ्य आहे किंवा कसें याचा विचार मुंबई सरकारानें केलेला दिसत नाहीं. हल्लींच्या राजवटींत जसे इंग्रजी शिकवणारे गुरु निराळे, तालीम शिकविणारे निराळे, ड्रॉइंग, भुगोल, महत्वमापन वगैरे विषयांचे गुरु निरनिराळे त्याप्रमाणें जेऊं घालणारा बाप निराळा, घरीं अभ्यासावर आणि वर्तनावर देखरेख ठेवणारा बाप निराळा असे बापांचे प्रकार आहेत ही कल्पना हिंदी विद्यार्थ्यांना जितका संतोष देईल तितका तो गुरुंची मालिका अधिक वाढवून व त्या सर्वांसंबधानें 'आचार्यदेवोभव' असा नियम करून होणार नाहीं!

## आयात व्यापारांतील चमत्कार.

आयात निर्यात व्यापारांत हिंदुस्थानच्या हिताची विशेष जपणूक न झाल्यामुळें कशी स्थिति होत आहे, याचा विचार गेले खेपेस केला. जोंपर्यंत या 'आव जाव घर तुमारा' पद्धतीवर मुळाशीं घाव बसणार नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्या औद्योगिक किंवा सांपात्तिक सुधारणे साठीं कितीही परिश्रम केले तरी ते फुकट आहेत. मागील खेपेस दिलेल्या उदाहरणापेक्षां थोड्या भिन्न स्वरुपाच्या उदाहरणाचा आज विचार करावयाचा आहे. सन १९०६-०७ मध्यें पूर्वींच्या वर्षापेक्षां शे. २० नी जास्त माल आयात झाला असें सरकारी रिपोर्टावरून दिसतें. रेशीम, रेल्वेच्या उपयोगी सामुग्री, लोखंड व कापसाचा तयार माल ह्यांत विशेष वाढ झालेली आहे. परदेशी दारूतही बरीच वाढ झाली. देशी दारू भट्ट्यांतून गतवर्षी २ लक्ष गॅलन जास्त निघाली असूनही परदेशी दारूच्या आयातींत वाढ व्हावी हें खेदजनक आहे. एक्साइज कमिशनच्या सूचना अमलांत आल्या तर हा दुष्प्रकार कमी होण्याचा संभव आहे, पण तो 'तर' मध्यें येत आहे! मिठासंबंधाचे आंकडे बरेच महत्वाचे आहेत. गतवर्षी मिठाच्या आयातींत वजनांत शें० १९ व किंमतींत शें. २० इतकी वाढ झाली. मिठावरील बहिष्कार बंद झाल्यामुळें ही वाढ झाली, असें याचें कारण सरकार तर्फे सांगण्यांत येतें. बहिष्कार लिव्हरपूलच्या मिठावर होता, आणि यंदाच्या रिपोर्टांतील आंकड्यांकडे पाहिलें तर लिव्हरपूलच्या मिठाची आयात शें. १०.७ नी कमी झालेली आहे. तथापि परदेशी मिठांत ग्रेटब्रिटन मधील मिठाचा नंबर परिमाणांत पहिला लागतो. आरबस्थानांतून येणारें मीठ त्या वाढत्या प्रमाणांत आहे. अलिकडे ईजिप्त मध्यें मीठ तयार करूं लागले असून तेथूनही हिंदुस्थानांत पुष्कळ मीठ येतें. साखरेच्या संबंधाची हकीकत बरीच निराशाजनक आहे. परदेशांतून येणारी कंदाची साखर बाजारांत जास्त खपते व तिच्या भावाशीं दुसऱ्या साखरेची बरोबरी होऊं शकत नाहीं. इतर देशाशीं तुलना केली तर उसाच्या लागवडीच्या क्षेत्राच्या मानांत आणि साखर करण्याच्या शास्त्रोक्त पद्धतींत हिंदुस्थान अगदींच मागें आहे असें दिसून येतें. गतवर्षी उसाची लागवड थोडीशी वाढली खरी तथापि रब्बीच्या पावसानें ताण दिल्यामुळें गूळ शें. १४ नी कमी झाला. हिंदुस्थानांत अद्यापि लागवडच फायदेशीर रीतीनें करितां येत नाहीं. क्यूबा, जावा, हवाई या ठिकाणीं दर एकरीं राबेचें मान अनुक्रमें २, २.४ व ४ टन पडतें; हिंदुस्थानांत तें पुरें १.२ पडत नाहीं. गुळापासून साखर करण्याची जुनी पद्धति सोडून देऊन नव्या, शास्त्रोक्त पद्धतीनें साखर तयार करून परदेशीं साखरेशीं बाजारांत टक्कर मारावयाची आहे तर उंसाची लागवड वाढली पाहिजे, त्या खेरीज नवी पद्धत यशस्वी होणें नाहीं. हिंदुस्थानांत खनिजद्रव्यांचा सांठा किती आहे आणि धातूचा माल परदेशांतून किती आयात होतो हेंहि पहाण्यासारखें आहे. तांब्यापितळेची भांडी परबडेनाशीं झालीं ह्मणून आमच्या लोकांना तीं विकून टाकून एनॅमल केलेलीं लोखंडीं भांडी घ्यावीं लागत आहेत. गतवर्षी या भांड्यांची आयात शे. ३० नी जास्त झाली. पत्रेंतीन लक्षांची शेतकीचीं आउतें जास्त आलीं. चिमण्या दिवे वगैरेंत शे. १४ वाढ झाली. एकंदर आयात मालांत शे. १० इतका धातूचा बनविलेला माल आहे. कारखानें वगैरेसाठीं लागणाऱ्या यंत्राचा आयातीच्या आंकड्यांत किंमतीकडे तीन वर्षांत शे. ३२ वाढ आहे. ही शेवटची बाब हिंदुस्थानच्या औद्योगिक पुनरुज्जीवनाची खूण दाखविते यांत शंकाच नाहीं. कोळशाची गोष्ट तशीच आहे. देशी कोळसा सालोसाल जास्त निघत आहे तरी तो पुरा न पडून परदेशी कोळशाची आयात वाढतच आहे.

## घरीं करतां येण्यासारखे धंदे.

आयात निर्यातीच्या आंकड्यानें मन व्यग्र झालें ह्मणजे आपल्या देशाच्या उद्योगधंद्यांच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग शोधण्याकडे साहजिकच प्रवृत्ती होते. या मार्गासंबंधानें बराच ऊहापोह चालूं असून निरनिराळ्या गृहस्थांच्या निरनिराळ्या मतांनीं या ऊहापोहाला वादाचेंहि स्वरूप कधीं कधीं येत असतें. हिंदुस्थानांत विलायती पद्धतीप्रमाणें मोठाल्या कारखान्यांची रीती फायद्याची होईल किंवा येथें लोकांनीं घरोघर बसून धंदे चालविण्यांत फायदा आहे हा प्रश्न मोठाल्या अडचणीचा होऊन बसला आहे. उभयपक्षांत गहन विचार केलेली मंडळी आहेत. श्री. सयाजीराव

महाराजासारख्यांचेंहि लक्ष या प्रश्नाकडे गेलेलें आहे, 'केवळ मोठमोठे कारखाने काढून हिंदुस्थानच्या लोकांना आपलीं गांवें सोडण्यास लावण्यानें लोकांची स्थिति सुधारेल असें ज्यांचें मत असेल त्यांना येथील प्रत्यक्ष माहिति कांहीं नाहीं असें समजावें' असे उद्गार श्री. महाराजांनीं काढलेले आहेत. आमचें सर्व राष्ट्र झोपड्यांत रहाणारें आहे आणि तेथें बसून जे उद्योग लोक करतील तेच सिद्धीस जातील असा स्वामी विवेकानंदयांचाहा अभिप्राय होता. या बाबतींत मद्रासचे डॉ. नानजुंदराव यांचा उपक्रम फारच स्तुत्य आहे, त्यांनीं स्त्रियास घर बसल्या करतां येण्यासारखे उद्योगधंदे शिकविण्याची एक शाळा मद्रास येथें काढलेली आहे. गेल्या दसऱ्याचे वेळीं म्हैसूर येथें भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत या शाळेंतील विद्यार्थिनींकडून कामाचे नमुने व कामाच्या पद्धति हीं दाखविण्यांत आलीं. सतरंज्या, गंजीफ्राक, पायमोजे वगैरे विणणें हीं कामें सध्यां शाळेंत करून पहाण्यांत येत आहेत. म्हैसूर येथील प्रदर्शनांत झालेल्या व्याख्यानमालेंत डॉ. नानजुंदराव यांचा या विषयावर एक निबंध वाचला गेला. त्यांत त्यांनीं स्त्रियांना कोणकोणते उद्योग घर बसल्या करितां येणें शक्य आहे व ते कसे फायदेशीर होतील या संबंधानें उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांनीं या निबंधांत असें दाखविलें आहे कीं, आपल्या समाजांत कनिष्ट दर्जाच्या तर काय पण मध्यम स्थितींतील बायकांना सुद्धां कामें करण्यांत कमीपणा वाटत नाहीं असें आढळून आलें आहे. सुरतेकडे बायका जरीच्या टोप्या करतात, दक्षिण हिंदुस्थानांत कोमटी बायका पत्रावळी लावतात, या प्रमाणें निरनिराळ्या भागांतील स्त्रिया कोणी टोपल्यीं वगैरे विणतात, कोणी गवती पट्ट्या विणतात, मुसलमान बायका जरीची लेस विणतात, या प्रमाणें बहुतेक सर्वत्र बायका कांहींना कांहीं उद्योग करतात, असें दिसून येतें. कचेरींत १५ रु. दरमहा मिळविणाऱ्या नवऱ्याच्या प्राप्तींत बायकोनें वर सांगितल्या प्रकारचा एखादा उद्योग घरबसल्या करून भर घातली तर किती चांगलें होईल? अनुभवांतीं असें कळून येतें कीं गंजीफ्राक, मोजे वगैरे जिन्नस तयार करण्यांत कच्च्या मालाच्या किंमतीवर शे. ५० ते ६० इतका नफा पडून शिवाय बाजारांत ते जिन्नस ज्या किंमतीस विकतात त्यापेक्षां शें. २५-३० नीं स्वस्त देण्यास परवडतात. फिती, नाड्या, नवारी, दिव्याच्या वाती वगैरे जिन्नस याच वर्गांत येतात. डॉ. नानजुंदराव यांचें असें ह्मणणें आहे कीं आपल्या शाळेंत पाहिलेल्या अनुभवावरून, दररोज सहा तास काम केल्यास रोजीं बारा आण्यापासून रुपयापर्यंत प्राप्ती पडावी. सतरंज्या विणण्याची कला आमच्या देशांत बरीच महत्वाची होती. पण आतां ती ज्या मुसलमान वर्गाचे हातीं राहिलेली आहे त्यांना तींत आपल्या हाताच्या ऐवजी अन्य साधनांचा उपयोग करण्याची बुद्धि होत नाहीं. सतरंज्या, गालीचे वगैरे जिनसांत रंगांची जुळणी वगैरे करण्यास जी कल्पकता लागते तिला हल्लींचा मुसलमान विणकर वर्ग पारखा होत चालला आहे. मध्यम स्थितींतील तरतरीत डोक्याच्या आणि सुशिक्षित स्त्रियांनीं ही जुळणी त्यांना करून देण्याचें पतकरलें तरी किती काम होईल? स्त्रियांनीं केलेल्या या जिनसांची विक्री कशी करावयाची हा प्रश्नही महत्वाचा आहे. याचें उत्तर डॉ. नानजुंदराव हे असें देतात, कीं या बाबतींत गांवोगांवीं स्त्रियांच्या परस्पर सहाय्यकारक संस्थांचा उपयोग फार होईल. संस्थेनें आपल्या सभासदांस ठोक खरेदीच्या भावानें कच्चा माल पुरवावा आणि तयार झालेल्या वस्तु विकत घेऊन बाजारांत पाठवाव्यात. अशा रितीनें मजुर व भांडवलवाला यांच्यामधील लढ्याचें भय होणार नाहीं.

## बलगेरियाचें स्वातंत्र्य.

तुर्कस्थानांतील राज्यक्रांति युरोपखंडांत अकल्पित उलढाली घडवून आणणार असा रंग दिसतो. तुर्कस्थानाला लागून असलेलें बलगेरिया नांवाचें ख्रिस्ती लोकांचें एक संस्थान आतांपर्यंत तुर्कस्थानच्या सुलतानाच्या मांडलिकत्वाखालीं होतें. युरोपखंडांत कोणी कोणाच्या प्रदेशावर किंवा हितसंबंधावर अतिक्रमण करूं नये असा बर्लिन येथें जो करार झाला, त्या अन्वयें तुर्कस्थानचें बलगेरियावरील सार्वभौमत्व आतां पर्यंत सुरक्षित होतें. परंतु गेले ५ वे तारखेस बलगेरियांतील प्रजेनें स्वातंत्र्याचें निशाण उभारून आपला तुर्कस्थानशीं कांहीं संबंध नाहीं अशी द्वाही फिरविली. बलगेरियाचे राजे प्रिन्स फर्डिनंड यांनीं या स्वतंत्र राज्याचा अधिकार आपल्या हातीं घेतला आहे, तथापि त्यांतील जबाबदारी आपल्या शिरीं घेण्याइतका प्रामाणिकपणा त्यांच्या अंगीं दिसत नाहीं. हें सर्व लोकांनीं केलें, आपल्याकडे यांतील कांहीं भाग नाहीं असें तुर्कस्थानला कळवून, त्यांनीं आपल्याशीं सुलतान साहेबांची दोस्ती कायम रहावी अशी आशा प्रकट केली आहे. बलेरियन लोकांची स्वातंत्र्यप्रियता प्रशंसनीय आहे यांत शंकाच नाहीं, पण त्यांनीं ज्याच्या हातीं आपला अधिकार दिला आहे त्याची दृष्टी इतकी सरळ नाहीं. या कृत्यांत त्याला आस्ट्रियाचें पाठबळ असावें असा संशय आहे आणि तसें असल्यास बलगेरियन लोकांच्या सदिच्छेला आस्ट्रियन आसुरी कल्पनेची जोड मिळाली आहे असें ठरेल. आस्ट्रियासारख्या बलाढ्य राष्ट्रानें एका बाजूस आपलें अंग टेकलें आहे, दुसरीकडे नुकतीच सुव्यवस्थित राज्यव्यवस्था अमलांत आणून उजळ माथ्यानें जगांत नांदूं लागलेलें तुर्कस्थानचें राष्ट्र आहे. अशा स्थितींत कांहीं घोटाळा उत्पन्न झाल्यास मध्यस्ती करण्यासाठीं इंग्लंड वगैरे राष्ट्रें टपून बसलीं आहेत. कोणीही बेकायदेशीर रितीनें वागूं नये, कोणाचेही हितसंबंध धोक्यांत येऊं न देत, अशी आपली इच्छा आहे वगैरे संभावितपणाचे बोल इंग्लिश मुत्सद्यांचे मुखांतून बाहेर पडूं लागले आहेत. या प्रकरणांत इंग्लंड जसें तिऱ्हाईत तशींच युरोपांतील बाकीचीं मोठीं राष्ट्रें आहेत. परंतु भूमध्यसमुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावर ग्रेट ब्रिटनचे बरेचसे हितानहित अवलंबून असल्यामुळें त्या राष्ट्राला मध्यें तोंड घालणें भाग पडलेसें दिसतें. तुर्कस्थानकडून या प्रकरणाचा कांहीं जबाब आलेला असला तरी हें प्रकरण लवकर मिटण्याचें चिन्ह दिसत नाहीं.

## प्लेगाच्या देवी

प्लेगाच्या देवी ह्मणजे प्लेगाच्या वर्तीत संजीवनी अमृतच होय. असा पक्का अभिप्राय सरकारचा अलिकडे होत चालला आहे. सरकार आपल्या तज्ञ वैद्यांचा अनुभव या गोष्टीच्या समनार्थ पुढें करीत असतात. प्लेगाच्या देवी सार्वत्रिक करण्याचा उपक्रम सरकारनें चालू केला आहे. प्रजाजनांच्या प्राणासंबंधानें ही सरकारची काळजी प्रशंसनीय असून त्यांच्या चांगल्या हेतू संबंधानें आह्मांस तिळप्राय संदेश नाहीं. बळजबरीनें प्लेगाच्या देवी टोंचण्याचा कायदा अद्याप सरकारानें केलेला नाहीं आणि तोंपर्यंत आह्मी समजतों कीं सरकारी प्रयत्न उपदेशाच्या कक्षेबाहेर गेले नाहींत. सरकारी प्रयत्न ह्मणजे या नव्या संजीवनीची पाणपोईच होय. ज्यांस इष्ट, युक्त, व विहित वाटेल त्यांनीं या अमृतप्रपेपासून लाभ करून घ्यावा.

## मार्गदर्शक.

प्लेगच्या देवीच्या पाणपोईला राजमार्ग आहेत आणि या मार्गाचे वाटाडे असे पुष्कळसे सरकारी अधिकारी आहेत. या मार्गदर्शकामध्यें राजश्री क्यांडी साहेब शाळा इनस्पेक्टर वऱ्हाड यांची गणना बऱ्याच श्रेष्टस्थानीं करितों. राजश्री क्यांडी हे सज्जन आहेत, सद्धेतुक आहेत व आपल्या शाळाखात्याचे कल्याणाचे चहाते आहेत. त्यांच्या चलाऊ कारभारांत जे बहिर्व्यापार शिरले आहेत त्यामध्यें प्लेगाच्या देवींचें देव्हारें मोठेंच आहे. त्यांनीं स्वतां देवी काढून घेतल्या आहेत आणि आतां प्लेगदेवीची क्रूसेड शाळाखात्यांत प्रचलित करीत आहेत. चांगली गोष्ट मनास पटली ह्मणजे ती केव्हांहि व कशाहि मुत्सद्दीपणानें सार्वत्रिक करावी ह्मणून त्यांनीं फार फार मनावर घेतलें आहे या बद्दल ते स्तुतीलाच पात्र आहेत. त्यांच्या मार्गदर्शकपणाला अधिकाराची नवी सांगड पडली आहे.

गेल्या सप्तकांत शिक्षकसमाजाच्या कार्या निमित्त आकोल्यास वऱ्हाडची ठळक ठळक शिक्षक व परीक्षक मंडळी जमली होती; तेव्हां या पर्वणीचा सुयोग साधून त्यांनीं प्लेगाच्या देवी टोंचण्याच्या कामांत प्रसिद्धीस आलेले डाक्टर मॉरिसन यांस मुद्दाम पाचारण केलें. प्लेगाच्या देवी काढण्यासंबंधानें आग्रह सुरू केला आणि विद्या परिषदेच्या सर्व सभासदांस प्रथम विचारणा केली तेव्हां सर्वांनींच कानावर हात टेंकले पण अन्नदात्या अधिकाऱ्यापुढें कोणाच्या तोंडून उलट प्रश्न निघेना. पण अखेरीस एका दोघा धैर्यवान शिक्षकांनीं सर्वांचीच अब्रू राखली. ट्राप आगेनच्या धंद्यांतील आमचे फादर विल्यम हे पक्के निग्रही आहेत. राजश्री क्यांडी यांनीं व्यक्तिशः देवींचा आग्रह केला तेव्हां पूर्वी जो समष्टीच्यानें नकार होता तो बराच नष्ट झाला आणि सुमारें चारपांच सद् गृहस्थ टोंचके घेते. हे सर्वजण प्रकृतीनें सुदृढ आहेत हें वर्तमान आह्मी अगोदर कळवितों.

आपला शिक्षकसमूह व परीक्षकसमूह असावा तसा कर्तुगामी नाहीं. हें रा० क्यांडी यांच्या ध्यानांत आलें. त्यांना बहुत रोष आला असावा आणि त्यामुळें त्यांच्या हातून गुरुवारच्या दिवशीं परिषदेच्या कामाचें सिंहावलोकन व उपसंहार हीं बरोबर झालीं नहींत त्यांनीं परिषदेच्या सभासदांस निक्षून उपदेश केला कीं, पुनः परत स्वग्रामीं गेल्या नंतर स्वतः प्लेगाच्या देवी टोंचून घेऊन आबालवृद्धांमध्यें त्या टोंचून घेण्याकडे चांगली प्रवृत्ती उत्पन्न करावी. ज्या आज्ञाधारक शिक्षकांनीं देवी काढून घेतल्या आहेत ते वरिष्ठांच्या कृपा प्रसादास पात्र आहेत तथापि त्यांना यापुढें बढती मिळत जाईल तेव्हां त्या उपकार दाक्षिण्याचा अन्योन्य संबंध भलतीकडे लावूं नये व शिक्षक कार्याशीं प्लेग देवीचा बादरायण संबंध कोणी जोडूं नये असें निराळें कळविण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

## अवरंगजेबी.

अवरंगजेब बादशहा महम्मदी धर्म जीव कीं प्राण असे आणि तो तलवारीच्या धारेवर सर्वजण मान्य करितात असें तो अमलांत आणी. अशा प्रकारची अवरंगजेबी राजश्री क्यांडी यांनीं विद्यापरिषदेमध्यें आरंभली होती असें ह्मणण्याइतका आह्माजवळ पुरावा नाहीं. तथापि त्यांच्या मनानें चांगली ह्मणून घेतलेल्या गोष्टी संबंधानें त्यांनीं अतिरेकाचें वर्तन केलें असा त्यांच्यावर लोकांचा आरोप आहे आणि तो खोटा नाहीं. शिक्षक व परिक्षक हा कांहीं त्यांचा बालवर्ग नाहीं. ज्यांस प्लेगाच्या देवी नकोत त्यांच्या आयुष्यांचा [illegible]हि त्यांनीं सरकारी पैशानें उतरलेला नव्हता. खरोखर प्लेगाच्या देवी लोकप्रिय कराव्या असा त्यांचा वर्णनीय हेतु होता—आणि तो तसा आहे—तर यांनीं शिक्षकांच्या देहावर अशी सत्ता चालविण्यापेक्षां त्यांच्या विचार सृष्टीमध्यें व्याख्यानद्वारा व प्रयोगद्वारा प्लेगाची महती उभी करावयाची होती. जो तो सुखाकडे धांवणारा आहे तेव्हां सज्ञान स्थितींतल्या शिक्षकांत आपलेसें करण्याचा खरा मार्ग ह्मणजे त्यांचें विचारच तसें पालटूं दिले पाहिजेत. राजश्री क्यांडी साहेबासारख्या अनुभवी अधिकाऱ्यांस आह्मी ही दिशा दाखवावी असें कांहीं नाहीं. त्यांचे हेतु कल्याणात्मक होते ह्मणूनच आह्मी त्यांस विनंती करतों कीं त्यांनीं निदान यापुढें येत्या नागपूरच्या प्रदर्शनाच्या वेळीं प्लेगाच्या देवी संबंधाची सर्व विद्या सप्रयोग लोकांपुढें मांडली जाईल अशा विषयीं स्थानिक सरकारकडून योजना करावी ह्मणजे त्यांचा हेतु सिद्धीला जाऊन कांहीं तरी गोड फळें त्यांच्या दृष्टीस आनंद देतील. शरीरावर अमल करण्याची अवरंगजेबी आतां बुडाली आणि तेथें बुद्धीवर विद्यादेवी साम्राज्य चालवित आहे हें सूज्ञांनीं पदोपदीं ध्यानात धरलें पाहिजे.

## वेदशाळा

येथील 'श्री लक्ष्मीनारायणा'च्या देवस्थानाची व्यवस्था फार वर्णनीय आहे. त्या संस्थेचे मुख्य चालक रा. रा. मोतीलाल बन्सीलाल यांनीं पुष्कळशा लोककल्याणाच्या गोष्टी मनावर घेतल्या आहेत. या मोठ्या नगराला वेदशाळेची मोठीच उणीव होती हें लक्ष्यांत येतांच त्यांनीं एक शाळा स्थापिली आणि तेथें एक घनपाठी विद्वान वेदसंपन्न अध्यापक नेमून त्यांच्या हातून यजुर्वेदाच्या अध्यापनाचा प्रारंभ गेल्या विजयादशमीच्या मुहूर्तावर करण्यांत आला आहे. दुसरी एक चांगली गोष्ट त्यांनीं मनांत योजिली आहे. तिचाही या ओघानें उल्लेख केल्या वांचून आमच्यानें रहावत नाहीं. आपल्या देवस्थानांत एक मौल्यवान पुस्तकालय संस्थापण्याचा रा० मोतीलाल यांचा विचार आहे. या लायब्ररींत धर्मविषयक संस्कृत व मराठी ग्रंथांचा संग्रह प्रथम करण्यांत येईल. वेद, उपनिषद् पुराणें, इतिहास, इत्यादि नानाविध विषयां वरील ग्रंथ क्रमाक्रमानें बोलावण्याचा त्यांचा संकल्प निश्चित झालेला असून त्या अन्वयें पुस्तकांच्या यादी तयार होत आहेत. पैसा पुष्कळ आहे. व दानधर्मा निमित्त तो राखूनही ठेविलेला आहे. तथापि कालमानाला अनुरूप उपयुक्ततेकडे व सार्वजनिक कल्याणाकडे तो पैसा खर्च करण्याची कला राजश्री मोतीलाल यांच्या अंगीं बाणत चालली ही संतोषाची गोष्ट होय.

## वऱ्हाड शिक्षक समाज

( आमच्या एका सन्मान्य मित्रांकडून )

सोमवार ता० १२ ते १५ आक्टोबर १९०८ पावेतों समाजाची बैठक येथील टौनहालांत झाली. समाजाच्या कामास सुरवात मे० सी. एच क्यांडी साहेबांनीं करावयाची परंतु प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें त्यांच्या परवानगी वरून रा. रा. रोहिणखेडकर हेड मास्तर अकोला हायस्कूल यांनीं प्रास्ताविक थोडेंसें भाषण करून कामास सुरवात केली.

नंतर गेल्या वर्षीं पोट शिक्षक समाजांनीं केलेल्या कामाचा रिपोर्ट वाचून दाखविला.

रा. रा. देवभानकर हेड मास्तर उमरावती हायस्कूल यांनीं इच्छा शक्तीची वाढ या विषयावर निबंध वाचला. हा पुष्कळसा भाषांतर असून शास्त्रीय होता व तो वक्त्याच्याच मनांत पूर्णपणें शिरल्या सारखा दिसला नाहीं. पोट शिक्षक समाजाकडून सूचनाचा विचार करण्या करितां कमेटी नेमून योग्य सूचनाचा विचार झाला.

इंग्रजी मराठी उर्दू दक्षिणा करितां आलेल्या पुस्त्यांची निवड करून योग्य ठरलेल्या पुस्त्यांस बक्षिसें देण्याचा ठराव झाला. रा. ग. व्यंकटेश शिवराम हे. मा. चिखली ए. व्ही. स्कूल यांनीं आधुनिक विद्यार्थी या विषयावर फारच मार्मिक निबंध वाचला. त्याला अनुभवाची परिपुष्टी असल्यामुळें तो अधिक विचारणीय असा वाटला. रा. रा. लेले हे. इं. आफ स्कूल्स उमरावती यांनीं दुसऱ्या इयत्तेतील मुलांस गोळ्यांच्या चौकटीच्या साह्यानें भाग पाडून एका पद्धतीनें भागाकार शिकवून दाखविला. भागाकार हा वजाबाकीचा संक्षेप आहे तो कसा व भागाकाराचे आणखी एक दोन प्रकार तरी सांगितले असते तर मुलांचा व इतर किंचित शिक्षकांचा जास्त उपयोग झाला असता.

रा. रा. एकनाथ गोविंद हा० मा० ए. व्ही. स्कूल इलिचपूर सिटी. यांनीं चित्रकलेचें महत्व यावर निबंध वाचला. सदरहू निबंध हा कार्यक्रमांत पहिले दिवशीं असून तो दुसरे दिवशीं वाचला व त्या ऐवजीं पहिले दिवशीं रा. रा. अकोली जहागीरचे सोमण हेड मा० यांनीं खेडेगांवांतील शाळा या विषयावर थोडा परंतु चटकदार निबंध वाचला.

रा. रा. गोखले प्रिंसिपाल ट्रे. स्कूल. अकोला यांनीं व्याकरण संबंधी कांहीं सूचना देऊन व्याकरण अगोदर कीं भाषा अगोदर वगैरे बद्दल माहिती दिली. संस्कृत वाक्यांचेही आधार दाखविले समास सांगत वेळीं भाषेंत समास करण्याकरितां आले आहेत हेंही सांगणें इष्ट होतें. संस्कृतांत ज्या अर्थी आधार सांगितले त्या अर्थी जे नियमाप्रमाणें समास झाले नसून त्यास समास मानण्याची रीत पडली आहे त्यास आर्ष असें संस्कृतांत मानण्याची पद्धत आहे असें ही सांगणें इष्ट होतें. एकंदरींत शिक्षण पद्धति फार चांगली व वर्णनीय अशी दिसून आली.

रा. रा. बाळकृष्ण वामन हे. टीचर मंगरूळ दस्तगीर यांनीं काव्य ह्मणजे काय व तें कसें शिकवावें या विषयावर निबंध वाचला. व इंग्रजी. ले इयत्तेतील मुलांस काव्य शिकवून दाखविलें.

रा. रा. गुर्जर व वेनकर सायन्स-टीचर्स उमरावती यांनीं रसायनजन्य विद्युत् संबंधी प्रयोग करून दाखविले. राजश्री गुर्जर यांचा प्रयोग फारच उत्तम वठला व प्रेक्षकांचीं मनें तल्लीन होऊन गेलीं होती प्रयोग आपल्यांस नीट दिसावा ह्मणून बराच प्रेक्षक समूह जाग्यावर उभा असून बरेच वेळां टाळ्याचा गजर होत होता. सदर प्रयोगाचें अवलोकन एकाग्र मनानें लोक करित असल्यामुळें ऐका महाराज ह्मणण्याचा अध्यक्षांना एकवेळही प्रसंग आला नाहीं.

तथापि प्रयोगकारांनीं विद्युत् संबंधी अगोदर बरीच जास्त माहिती दिली असती तर लोकांना जास्तच लाभ झाला असता. निदान मुखमुख्य. विद्युत किती प्रकारची, लोकांचें लक्ष तिच्या अभ्यासाकडे व ज्ञानाकडे कसें लागलें, २०० वर्षा पूर्वीची व हल्लींची स्थिति यांत अंतर किती व कसें पडलें, फ्रांकलिन, अँपियर फराडे, डेव्ही, थेल्स, गिलबर्ट न्यूतन, व्हिट्र, क्युनिअस, मुशेनब्रोक, वगैरे विद्वानांनी काय काय यासंबंधी ज्ञानांत भर घातली. विद्युत् ही व्यवहारोपयोगी केव्हां झाली व हल्लीं तरी ती पूर्णत्वास आली आहे काय वगैरे गोष्टी अवश्य सांगावयाला पाहिजे होत्या.

रा. रा. वैद्य हे. इ. अकोला यांनीं ४ थे इयत्तेतील मुलांस वाचन पाठ–रामचंद्राचा धडा–चांगला मार्मिकपणानें शिकवून दाखविला व तो मुलांना ठसवाही. असें पाठाचे सर्वहीं त्यांनीं केलेल्या परिक्षणावरून स्पष्ट दिसून आलें. ही शिक्षण पद्धति श्रेष्ठासारखी आहे.

रा. रा. सुनगांवचे हेडमास्तर शामराव जानजी यांनीं मुलांना सुनगांवचा नकाशा दाखवून पटवारी पणाचे कागदाची माहिती दिली.

येथील महारांचे रात्रीचे शाळेचे मास्तर यांनीं एक लहानसा निबंध वाचला. व आपले शाळेस इमारत बांधण्याकरितां ह्मणून वर्गणीची यादी केली. व कांहीं वर्गणीही गोळा झाली.

रा. रा. अबदूल अजीमखान असि. मा. ए. व्ही. स्कूल वाशिम यांनीं शिक्षा या विषयावर निबंध वाचला. रा. रा. अनंत नारायण मोहाळेकर असि. मा. ए. व्ही. स्कूल दर्यापूर यांनीं मुलांस नवीन रीतीनें भूमिती शिकवून दाखविली. रा. रा. गणपत विठ्ठल असि. मा. कोळापूर यांनीं अनुकरण या विषयावर चटकदार निबंध वाचला.

रा. रा. देवळे असि. मास्तर व्ही स्कूल मूर्तिजापूर यांनीं इंग्रजी दुसरे इयत्तेतील मुलांस इंग्रजी पुस्तकांतील एक धडा भाषण पद्धतीनें शिकवून दाखविला.

रा. रा. जगन्नाथ नारायण फ. असि. शुक्रवार पेठ वाशीम यांनीं शिशु वर्ग शिकवून दाखविला. पुढील सालाकरितां अंदाज पत्रक व सेक्रेटरी व अध्यक्ष यांच्या नेमणुका इत्यादि गोष्टी झाल्या.

रावसाहेब आण्णा साहेब तळवळकर, उमरावती यांचा आदरसत्कार मुद्दाम करून हार तुरे व पानसुपारी वगैरे दिली. या समारंभाला ही गोष्ट आवश्यक होती. राजश्री आण्णा साहेबांनीं केलेला थोडासाच उपदेश फार बोधप्रद होता.

रावसाहेब आण्णा साहेब महाजनी यांनीं शिष्य आणि शिक्षक यांचा प्राचीन काळीं असलेला संबंध या विषयावर सुश्राव्य, व विद्वत्ता परिप्लुत असा फार उत्तम निबंध वाचला.

शिक्षक समाजाचे व इन्स्पेक्टर मंडळाचे सेक्रेटरी यांनीं आपआपले समाजाचे कामाचे रिपोर्ट वाचून दाखविले.

मे. क्यांडी साहेब इ. आ. स्कूल्स वऱ्हाड यांनीं समाजांत इन्याक्युलेशन फार थोड्या मंडळींनीं करून घेतलें याबद्दल दिलगिरी दर्शवून बाकीच्या लोकांनीं करून घेण्याबद्दल उपदेश करून व शिक्षणाचे बाबतींत थोडासा उपदेश करून समाजाचें विसर्जन केलें.

## विद्यार्थ्यांचे खेळ.

उमरावती, मूर्तिजापूर व आकोला येथील विद्यार्थ्यांचे सामन्याचे खेळ गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं झाले. विद्यार्थ्यांची हास्यमुद्रा त्यांची विजयश्री संबंधाची महत्वाकांक्षा, खेळांमधील प्राविण्य व कौशल्य हीं पाहून फार आनंद वाटला. मलखांब, पॅरलल बार टग आफ वार इत्यादि खेळांत आकोलेकरांची सरशी झाली. क्रिकेटमध्यें विजय ठरविण्या इतका खेळ पुरा झाला नाहीं. फूटबालच्या खेळांत दोघांची बरोबरी झाली. पळण्याच्या शर्यतींत उमरावतीकरांची व मूर्तिजापूरकरांची सरशी झाली. गेल्या शनिवारीं सायंकाळीं येथील लोकप्रिय पोलिस सुपरिन्टेंडेंट राजश्री कार्नेगी यांच्या श्रीमती पत्नीच्या हातून बक्षीसें वाटण्यांत आलीं.

## वऱ्हाडवृत्त.

**सुट्टी दिवाळीच्या महोत्सवा निमित्त मामूल वहिवाटी प्रमाणें आमचा येत्या सोमवारचा अंक प्रसिद्ध होणार नाहीं.**

हवामान— पावसानें टाळा दिला असें वाटतें. पाऊस पाहिजे आहे आणि न येईल तर पीकाचा जोम फार कमी होईल. हल्लीं उन्हाळा विशेष वाटतो. सार्वजनिक आरोग्य चांगलें असावयाला पाहिजे पण प्लेग उमरावती, खामगांव, आकोट व या गांवाच्या आसपास पसरत चालला आहे.

इंपिरिअल सिव्हील सरव्हिस मधील अधिकाऱ्यांचें संमेलन दरवर्षीं नागपुरास नोवेंबर महिन्यांत भरत असतें या संमेलनाला नामदार चीफ कमिशनर यांचा सप्ताह ह्मणतात. या संमेलनाचा हेतु हाताखालील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांचे राज्यकारभारा संबंधीचे अभिप्राय स्थानिक सरकारास कळावे आणि सरकारचें धोरण या अधिकाऱ्यांस कळावें असा आहे. आतां वरील संमेलना प्रमाणें प्रांतिक अधिकाऱ्यांचें संमेलन दरसाल भरवावें असा विचार नागपुराकडील पुष्कळ अधिकाऱ्यांच्या मनांत येऊन त्यांनीं त्या गोष्टीला स्थानिक सरकारची मंजुरात मागितली आहे. हें संमेलन डिसेंबरच्या १ ल्या सप्तकांत भरवावें असा संकेत आहे. जिल्ह्या जिल्ह्यांतून सबजज व एकदा असि. कमिशनर यांस कामाचें धोरण पाहून नागपुरास जाण्याची परवानगी मिळावी ह्मणून स्थानिक सरकारास विनंती करण्यांत येणार आहे. अशा रितीनें प्राव्हिनशिअल सरव्हिस मधील अधिकाऱ्यांच्या अभिप्रायांस पुष्कळ वजन देण्यांत येईल असा भरंवसा आहे. ही नवी योजना फार नामी आहे. आणि ही गोष्ट राजश्री क्रॅडाक सारखे अनुभवी व लोकप्रिय अधिकारी मान्य करतील असें आह्मांस वाटतें.

रा. रा. ब्लेकॉक चीफ सेक्रेटरी हे इनस्पेक्टर जनरल ऑफ पोलिस होणार असून त्यांच्या जागीं बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर मेजर फोल्ब हे नागपुरास जातील आणि राजश्री फरी हे रजेवरून परत येतांच बुलढाण्यास डिपुटी कमिशनर होतील असें कळतें.

आकोटास प्लेगाचे उंदीर पुष्कळ मरत असतात व तहशील कचेरींत देखील असे मृत उंदीर सांपडत आहेत. अशा प्रसंगीं जसा गांव खालीं होत आहे तशी कचेरी खालीं करण्यांत येईल तर बरें.

रा. रा. ब्राऊन आय. सी. एस हे रजे नंतर परत येतांच या जिल्ह्यांत दाखल होतील आणि त्यांची नेमणूक वाशिमास होईल असा रंग आहे.

गुरु–शुक्र हे दोन्ही तारे गेल्या बुधवारीं प्रातःकाळीं अगदीं जवळ एका रेषेंत आले. शुक्राला डाव्या बाजूला दक्षिणेकडे टाकून गुरु आतां दररोज वरवर येत चालला आहे. सामीप्यानें शुक्राच्या तेजामध्यें गुरुचा दूरवरचा तेजोगोल डोळ्याला फार रमणीय दिसतो.

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस—
सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोंचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहू यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही
दहागीरदार सीप रायी श्रीमंत नानासाहेब ( ग्वालेर ) फाळके दफ्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

**सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.**

स्थापना सन १९०७

**भांडवल एक लक्ष रुपये.**

**प्रत्येक भाग २५ रुपयाचा याप्रमाणें एकंदर भाग ४०००.**

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदरहू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदरहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकुमावरून
**पी. सी. जोगळेकर**
**आणि कंपनी**
**म्या. एजंटस्**


नं. ९३

## दवाखाना.

आमचे दवाखान्यांत सर्व तऱ्हेच्या वनौषधी, मात्रा, गुटिका, चूर्ण वगैरे विक्रीस तयार आहेत. बाळंतरोग, गर्मी परमा, मुळव्याध, कावळ, पानथरी, हरतऱ्हेचे हिवताप इ. रोग कळविल्यास परिक्षा करून अनुभवीक औषधें माफकदरानें पाठवूं. घरीं बोलविल्यास वेगळी फी घेतली जाईल. गजकर्ण मलम की. बाटली ८६.

शिवचरणगीर रामगीर वैद्य,
कुरणखेडकर
दवाखाना शहर आकोला

दोन घड्याळें एकदम घेणारास टपाल खर्च माफ.
मुद्रणाच्या २४ शिश्या बोलविणारास २ सिलन घड्याळ बक्षीस साखळी सुधां शिवाय ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वर्ली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घड्याळ रु. १४ सोल्जर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाला रु. ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.
नं. ४७ मुंबई पोस्ट नं. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडें व जे वर खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरुस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

लेखक.
सायकल टीचर.

पत्ताः----
अहमद अली कासमजी बोहरा
नं ४८ इ. ७ आकोला ( शहर )

नांद नवाब परोपर्ष

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व वक्तशिर पाठवीला जाईल. आह्मांस शेंकडों पत्र आलीं आहेत.

पत्ताः—
श्रीनिवास बाळकृष्ण हो... मरचंट व कामशन एजंट.
नं ७२ येवले.

## नोटीस

वेशमी रावमट विन सदाशिवभट जोशी राहणार बावनबीर तालुका जळगांव जिल्हा बुलढाणा यासः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं मुद्दी ५-४-०८ रोजीं १५० घेऊन तावेगहाणखत करून देण्याचा करारनामा करून दिला आणि त्या करारनाम्याला विष्णु बळकृष्ण कुळकर्णी बावनबीर, दिनकर श्रीधर पाटील गाडेगांव व बाळकृष्ण तुकाराम जोशी बावनबीर हे तिघेजण जामीन झाले आहेत. करारनाम्या प्रमाणें तुह्मी तावेगहाणखत लिहून नोंदून दिलें नाहीं. व गहाणमालही ताब्यांत दिला नाहीं- तर ही नोटिस पोंचतांच आठ दिवसांच्या आंत करारनाम्या प्रमाणें सर्व गोष्टी पुऱ्या करून द्याव्या. नाहीं तर विरुद्ध शर्तींच्या नुकसानीच्या बाबी चालू झाल्याच आहेत त्याबाबी ह्मणजे नोटीशीचा खर्च व तन्निमित्त झालेला तीन तारखांचा खर्च रुपये २० व त्याशिवाय वाटखर्चा- नंतर फिर्याद वगैरेचा सर्व खर्च तुह्माकडून वसूल केला जाईल. तुह्माकडून जो वसूल ६० रुपये आला आहे. त्यांतून वरील खर्च वजा केला जाईल आणि बाकीची रकम देखील अशीच वजावाटीकडे लाविली जाईल. करारनाम्यांतील प्रत्येक शर्ती प्रमाणें तुह्माकडून नुकसानी भरून घतली जाईल तावेगहाणाच्या कराराप्रमाणें १३१८ फसलीच्या पीकाची व आंबराईची नुकसानी अंदाजा रुपये १०० शंभर तुह्माकडून घेतली जाईल.

सही
शिवप्रसाद चुन्नीलाल दुकान बादनबीर तर्फे दस्तुर लक्ष्मीनारायण गणेशनारायण रा. पंचगव्हाण

नं. ध. ९६

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. रामनारायण सुरजमल चांडक व दाजी जानकीराम भुसारी उभयतां राहणार पेंठ खामगांव तालुके खामगांव यासः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं. तुह्मांस आमचे खामगांव वडासिंगी, तेल्हारा वगैरे दुकानचे नांवनें मुखत्यारपत्र शिवरत शिवप्रताप आ. पा. आई राधाबाई जवजे शिवप्रताप या नावानी ता. ११-११-१९०६ इ. रोजीं लिहून देऊन ता. १२-१२-१९०६ इसवी रोजीं रजिष्टर करून दिलें होतें. परंतु आतां मी सज्ञान झालो वरून तुमचे उभयताचें मुखत्यार पत्र रद्द केलें आहे. करितां तुमचे जवळ आमचे दुकानसंबंधीं असलेले कागद पत्र आह्मांस देणे. सबब नोटिशीनें कळविलें आहे. कळावें ता. १५-१०-०८ इ.

सही ( मारवाडींत )
सेवाराम शिवरतन मालक
शिवरतन शिवप्रताप
बागडी दस्तूर खुद

नं. ध. ९७

## जाहिरात

जाहिरात तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं रामनारायण सुरजमल केसरी चांडक राहणार खामगांव यांचे मुखत्यार पत्र रद्द केलें. परंतु सदरहू इसमास कळविण्यांत येतें कीं तुमचे हातचे आमचे दुकानचे नावाची हुंडी, चिट्ठी, रसीद वगैरे जमाखर्च जे असतील ते आह्मांस कबूल आहेत आमचे वहींत लिहिलें नसेल तें आह्मांस कबूल नाहीं आणि यापुढें तुह्मी हुंडी पत्रीवर सही वगैरे करण्यास आपली बिलकूल परवानगी नाहीं. सबब तुह्मांस जाहिरातीनें कळविलें आहे. कळावें ता. १९-१०-१९०८ इसवी

सही
सेवाराम शिवरतन मालक
शिवरतन शिवप्रताप
बागडी दस्तूर खुद

नं. ध. ९८

## वर्तमानसार.

सहारनल, वनमाळी व आणखी एक इसम अशा तिघांवर चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढें दहा दहा रुपयांच्या ५०० नोटा चोरल्याच्या आरोपावरून खटला करण्यांत आला. गव्हर्मेंट प्रॉसिक्युटर खटल्याची सुनावणी करतांना ह्मणाले:—करन्सी ऑफिसमधील सहारनल याने नोटा चोरल्या व दुसरा आरोपी वनमाळी यानें कलकत्ता सर्कलच्या नोटावर सह्या करणारे ऑफिसर मि. आ. टी. बॅरो यांच्या सहीचे दोन ठसे तयार केले. तिसऱ्या आरोपीनें ( हा आरोपी फरारी आहे ) यानें बनावट नोटा खऱ्या ह्मणून वापरल्या. पोलिसांकडून पुराव्याची अद्याप समाधानकारक झाली नाहीं सबब मुदत मिळाली.

परवानी नसतां १९४ काडतुसें जवळ बाळगल्याच्या आरोपावरून हसनमिया फत्तेमहमद व मदनसेट या नांवाच्या दोन पठाणांस पकडण्यांत आलें होतें. त्याचेबद्दल खटल्याचा निकाल मि. बिर्ड यांनीं देऊन आरोपींस दोषमुक्त केलें आहे. खटल्यांत पुढें आलेल्या पुराव्यावर मि. बिर्ड यांनीं बरीच टीका केली आहे. कोणाजवळ तरी खुणेचे पैसे देऊन ज्या ज्याविषयीं वहीम असेल त्यांमकडे वस्तु खरेदीसाठीं पाठवावयाच्या व अशा रीतीनें वहिमी माणसांकडून वस्तु मिळाल्यास खुणेच्या नाण्यामुद्धां त्यास पकडावयाचें असा नेहमींचा प्रघात आहे. प्रस्तुत खटल्यांत अबदुल घनी हा गुन्ह्याचा छडा लावण्यासाठीं इन्स्पेक्टरनीं आपल्यास दहा दहा रुपयांच्या दोन नोटा दिल्या असें ह्मणतो; परंतु इन्स्पेक्टर नोटा दिल्याची गोष्ट नाकबूल करितात. अबदुल घनी यांस नोटा दिल्या असून इन्स्पेक्टर रमंड आतां ती गोष्ट नाकारीत आहे ही गोष्ट अश्रद्धेय आहे. पुराव्यामध्यें विसंगतता फार असल्यामुळें मी आरोपीला दोषमुक्त करून सोडून देतों.

'उर्दू स्वराज्य' पत्राचे संपादक मुनशी शांतिनारायण यांस अलाहाबादच्या डि. मॅजिस्ट्रेटनीं २॥ वर्षें सक्तमजुरीची शिक्षा दिली होती. या शिक्षेवर हायकोर्टांत अपील झालें होतें. जस्टिस ग्रिफिन यांनीं खालच्या कोर्टाचा ठराव फिरव ण्याचें नाकारलें.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या काहीं खोट्या मुग्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. पाहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकट आम्हास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आमची एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजिवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक, रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरिक मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तर शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नाना कारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्याप या गुटका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसात एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, मठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, आग्रमांद्य मस्तकशूळ, मळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधूमेह कुनार पामा, मुष्ठमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी सजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोदीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांस उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत वेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खडी सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः–एकदम ३९ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११९ गो ३ रु. १६९ गो. ४ रु. २७९ गो० ६ रु. ९९० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः–यानें दडस; माहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, व इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः–कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडिक मुत्राची लाली, संकोच पुयस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ ११ मार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूडः–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे.

५ विंचूचें विषः–औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः–औषध घेताच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये म्हणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागव तो फुकट पाठवूं आपवांत दापाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय निरनिराळ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म चूर्ण. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खडी सोबत टपाल खर्च वेगळा पडेल पैसोनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका ना धंदा सुरू केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातींस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊन याचा समून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो पूर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली पोळी गाण्याचा ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १९।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधांनें कित्येक ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधुस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचीच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवी. एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरा गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established 1874.*

*HEAD OFFICE*—BOMBAY

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested— in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, professional men, Tradesmen and others* employing a portion of their annual income or profits in effecting a policy once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
Nagpur.

No. 2

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी सदाशिवाश्रयांत छापून प्रसिद्ध केलें.